10. **In case of creation or acquisition of capital asset, furnish the details relating to the asset so created or acquired through CSR spent in the financial year (asset-wise details):**

Not Applicable.

11. **Specify the reason(s) if the Company has failed to spend two percent of the average net profit as per Section 135(5):**

During the year 2022-23 a sum of Rs 192.00/- lakhs appx was allocated for the CSR activities out of which Rs. 159.39/- lakhs appx spent on the CSR activities and Rs. 36.90/- lakhs appx was transferred to FDCM Unspent Corporate Social Responsibility Account for completing the CSR activities.

The amount of Rs. 10.00/- lakhs earmarked for the Rotary of Nagpur South Community Welfare Association for conducting the medical diagnostic and surgical camp for the benefit of the tribal and rural villagers in Melghat which was transferred to FDCM Unspent Corporate Social Responsibility is transferred by the Company to the "PM Relief fund" specified under schedule VII of the Companies Act, 2013 because of the non-providence of the document by the said organization.

| | |
|---|---|
| **(B. Venugopal Reddy)** | **(Vikas Gupta)** |
| **Chairman CSR Committee** | **Managing Director** |
| **DIN: 03611800** | **DIN: 09753905** |

**Date:** 28-12-2023
**Place:** Chandrapur

**ANNEXURE-2**

Form AOC-1

(Pursuant to first proviso to sub-section (3) of section 129 read with rule 5 of Companies (Accounts) Rules, 2014)

Statement containing salient features of the financial statement of subsidiaries/associate companies/joint ventures

Part "A": Subsidiaries

(Information in respect of each subsidiary to be presented with amounts in Rs.)

(In Rs.)

| Sl. No. | Particulars | Details |
|---|---|---|
| 1. | Name of the subsidiary | FDCM Gorewada Zoo Limited (formerly known as FDCM Esselworld Gorewada Zoo Private Limited) |
| 2. | Reporting period for the subsidiary concerned, if different from the holding company's reporting period | 01.04.2022-31.03.2023 |
| 3. | Reporting currency and Exchange rate as on the last date of the relevant Financial year in the case of foreign subsidiaries | NA |
| 4. | Share capital | 10.00 lacs |
| 5. | Reserves & surplus | 287.84 lacs |
| 6. | Total assets | 3322.89 lacs |
| 7. | Total Liabilities | 3322.89 lacs |
| 8. | Investments | 100.00 lacs |
| 9. | Turnover | 992.37 lacs |
| 10. | Profit before taxation | 381.43 lacs |
| 11. | Provision for taxation | 118.52 lacs |
| 12. | Profit after taxation | 262.91 lacs |
| 13. | Proposed Dividend | 0 |
| 14. | % of shareholding (As on 31.03.2023) | 100% |

Notes: The following information shall be furnished at the end of the statement:

1. Names of subsidiaries which are yet to commence operations -NA
2. Names of subsidiaries which have been liquidated or sold during the year -NA

Part "B": Associates and Joint Ventures

Statement pursuant to Section 129 (3) of the Companies Act, 2013 related to Associate Companies and Joint Ventures

| Name of associates/Joint Ventures | NA | NA | NA |
|---|---|---|---|
| 1. Latest audited Balance Sheet Date | NA | NA | NA |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 2. Shares of Associate/Joint Ventures held by the company on the year end | NA | NA | NA |
| No. | | | |
| Amount of Investment in Associates/Joint Venture | NA | NA | NA |
| Extend of Holding% | NA | NA | NA |
| | | | |
| 3. Description of how there is significant influence | NA | NA | NA |
| | | | |
| 4. Reason why the associate/joint venture is not consolidated | NA | NA | NA |
| | | | |
| 5. Net worth attributable to shareholding as per latest audited Balance Sheet | NA | NA | NA |
| | | | |
| 6. Profit/Loss for the year | NA | NA | NA |
| i. Considered in Consolidation | NA | NA | NA |
| ii. Not Considered in Consolidation | NA | NA | NA |

1. Names of associates or joint ventures which are yet to commence operations:- NA
2. Names of associates or joint ventures which have been liquidated or sold during the year:- NA

**On behalf of the Board of Directors**

**Sudhir S. Mungantiwar**
**Chairman**
**DIN: 07208373**

**Vikas Gupta**
**Managing Director**
**DIN: 09753905**

**Date:** 28.12.2023
**Place:** Chandrapur

Form No. AOC-2

(Pursuant to clause (h) of sub-section (3) of section 134 of the Act and Rule 8(2) of the Companies (Accounts) Rules, 2014)

Form for disclosure of particulars of contracts/arrangements entered into by the company with related parties referred to in sub-section (1) of section 188 of the Companies Act, 2013 including certain arm's length transactions under third proviso thereto.

1. Details of contracts or arrangements or transactions not at arm's length basis---NA

(a) Name(s) of the related party and nature of relationship:

(b) Nature of contracts/arrangements/transactions

(c) Duration of the contracts / arrangements/transactions

(d) Salient terms of the contracts or arrangements or transactions including the value, if any

(e) Justification for entering into such contracts or arrangements or transactions

(f) date(s) of approval by the Board

(g) Amount paid as advances, if any:

(h) Date on which the special resolution was passed in general meeting as required under first proviso to section 188

2. Details of material contracts or arrangement or transactions at arm's length basis –

| | | |
|---|---|---|
| (a) | Name(s) of the related party and nature of relationship: | FDCM Gorewada Zoo Limited (Formerly known as Esselworld Gorewada Zoo Pvt. Ltd.)<br>Relationship: Wholly Owned Subsidiary Company |
| (b) | Nature of contracts/arrangements/transactions: | As per the Government of Maharashtra directions and arrangement the VGF was paid to Wholly Owned Subsidiary Company for the Development of the Project and normal non-business transactions. |
| (c) | Duration of the contracts / arrangements/transactions: | NA |
| (d) | Salient terms of the contracts or arrangements or transactions including the value, if any: | NA |
| (e) | Date(s) of approval by the Board, if any | NA |
| (f) | Amount paid in advance, if any | As on 31st March, 2023 the balance advance is Nil |

**On behalf of the Board of Directors**

**Sudhir S. Mungantiwar**
**Chairman**
**DIN: 07208373**

**Vikas Gupta**
**Managing Director**
**DIN: 09753905**

**Date:** 28.12.2023
**Place:** Chandrapur

# कार्यालय
# महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर

# OFFICE OF THE
# ACCOUNTANT GENERAL (AUDIT)-II, MAHARASHTRA, NAGPUR

डी.पी. सेल (ए एम जी-II)/एफडीसीएम/२२-२३/०६
दिनांक १५-०४-२०२४

**गोपनीय**

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
एफडीसीएम भवन, प्लॉट क्र. ३५९/ब, अंबाझरी, हिंगणा रोड,
नागपूर ४४० ०३६.

विषय: फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वतंत्र लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अभिप्राय.

महोदय / महोदया,

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वतंत्र लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे "निरंक" अभिप्राय प्रमाणपत्र (Nil Comment Certificate) सोबत जोडले आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभा (A.G.M.) झाल्यानंतर वार्षिक अहवालाच्या तीन छापील प्रती या कार्यालयास कृपया पाठविण्यात याव्यात, तसेच उपरोक्त वार्षिक अहवाल विधान सभेत सादर करण्याची तारीख या कार्यालयास कळवावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत
(नरेश कुमार मन्ने)
उप महालेखाकार/AMG-II

सहपत्र: वरील प्रमाणे

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) अंतर्गत फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूरच्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रावरील अभिप्राय**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरीता वित्तीय विवरणपत्रे, कंपनी अधिनियम २०१३ नुसार विहीत केलेल्या अहवालाचे चौकटीत तयार करण्याची जबाबदारी ही कंपनीच्या व्यवस्थापनाची आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३९ (५) नुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखापरीक्षक हे अधिनियमाच्या कलम १४३ अंतर्गत त्यांनी स्वतंत्रपणे केलेल्या लेखापरीक्षणाचे आधारे व अधिनियमाच्या कलम १४३ (१०) अंतर्गत विहित लेखापरीक्षण प्रमाणानुसार या वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी जबाबदार आहेत. त्यांनी ही जबाबदारी पार पाडल्याचे त्यांचे दिनांक २८.१२.२०२३ रोजीच्या लेखापरीक्षकांच्या अहवालात नमूद केले आहे.

मी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे वतीने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (अ) नुसार फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूरच्या दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे पूरक लेखा परीक्षण केलेले आहे. हे पूरक लेखापरीक्षण आम्ही सांविधिक लेखा परीक्षकांचे कामाची कागदपत्रे न पाहता आणि मूलतः सांविधिक लेखापरीक्षकांनी केलेल्या प्राथमिक तपासाला मर्यादित राहून स्वतंत्रपणे आणि कंपनीच्या अभिमत व्यक्ती व लेखांकनासंबंधी निवडक अभिलेख तपासून केले आहे.

माझ्या पूरक लेखा परीक्षणाच्या आधारावर सांविधीक लेखा परीक्षकांचे अहवालावर अधिनियमाच्या कलम १४३ (६) (ब) अंतर्गत कोणतेही अभिप्राय किंवा पुरवणी देण्यायोग्य कोणतीही ठळक बाबी माझे निदर्शनास आलेली नाही.

1.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांचे वतीने व करिता

स्थळ : नागपूर

*स्वाक्षरीत*

दिनांक: /०४/२०२४

(लता मल्लीकार्जुना)
प्रधान महालेखाकार

| | |
|---|---|
| शाह बाहेती चांडक आणि कंपनी,<br>सनदी लेखापाल,<br>२०५ घटाटे चेंबर्स,<br>पंचशील चौक<br>नागपूर - ४४० ०१२. | सी एन पटेल आणि कंपनी,<br>सनदी लेखापाल,<br>प्लॉट नं.१२,<br>एसबीआय एम्प्लॉईज आराधना<br>सोसायटी, काटोल रोड,<br>नागपूर - ४४० ०१३ |

## **"स्वतंत्र लेखा परीक्षकांचा अहवाल"**

प्रति,
सभासद,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

## **स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे लेखा परीक्षणावर अहवाल**

### **१. अभिप्राय**

आम्ही फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (यानंतर कंपनी म्हणून निर्दिष्ट) चे सोबतचे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे ज्यात दिनांक ३१ मार्च २०२३ रोजीचा स्वतंत्र ताळेबंद, स्वतंत्र नफातोट्याचा हिशेब (इतर समावेशक उत्पन्न अंतर्भूत करुन) व स्वतंत्र रोख प्रवाह विवरण पत्र, संपलेल्या वर्षाकरीता भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र तसेच महत्वाच्या लेखा विषयक धोरणाचे सारांशासह स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रास टिपणी आणि त्यासोबत जोडलेल्या इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचे लेखापरीक्षण केले आहे.

आमच्या मते व संपूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार पूर्वोक्त वित्तीय विवरणपत्रे कंपनी अधिनियम २०१३ ('अधिनियम') नुसार आवश्यक असलेली माहिती देत असून अधिनियमाच्या कलम १३३ अंतर्गत सुधारित केल्याप्रमाणे कंपनी (भारतीय लेखांकन मानक) नियम २०१५ सह वाचल्यास त्याअन्वये विहित केलेल्या भारतीय लेखांकन मानकाशी (Ind AS) अनुरुप आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार दि. ३१ मार्च २०२३ अखेर कंपनीची स्थिती, स्वतंत्र नफा व एकूण स्वतंत्र समावेशक उत्पन्न, स्वतंत्र भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र आणि त्या दिवशी संपणा-या वर्षाकरिता स्वतंत्र रोख प्रवाह विवरणपत्र यांची खरी व वास्तववादी स्थिती दर्शवित आहेत.

### **२. अभिप्रायाकरिता आधार**

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत विनिर्दिष्ट लेखापरीक्षण मानकानुसार (SAs) आम्ही स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे आमचे लेखापरीक्षण केले आहे. ह्या मानकांतर्गत आमच्या जबाबदा-या पुढे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षणा करिता जबाबदा-या अंतर्गत वर्णन केल्या असून त्या आमच्या अहवालाचा भाग आहेत. भारतीय सनदी लेखापाल संस्थेव्दारे निर्गमित नीतितत्व संहितेनुसार तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतूदी अंतर्गत स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणाशी सुसंबध्द असलेल्या

नैतिक आवश्यकता सह आणि सदर आवश्यकता तसेच नीतितत्व संहितेनुसार आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदा-या पार पाडल्या असून त्यानुसार आम्ही कंपनीपासून स्वतंत्र आहोत.

आम्ही प्राप्त केलेला लेखापरीक्षण विषयक पुरावा स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रावर आमचे अभिप्राय व्यक्त करण्यासाठी पुरेसा व समर्पक आधार आहे असा आम्हाला विश्वास आहे.

**अ. लेखापरीक्षण विषयक महत्वाच्या बाबी**

असूचीबध्द कंपनी असल्यामुळे एसए ७०१, लेखा परीक्षण विषयक महत्वाच्या बाबींनुसार लेखापरीक्षण विषयक महत्वाच्या बाबींचे प्रतिवेदन कंपनीला लागू नाही.

**ब. महत्वपूर्ण बाब (Emphasis of Matter)**

१. कंपनीने आपल्या कर्मचा-यांसाठी रजा रोखीकरण लाभा संबंधाने निवृत्ती लाभांचे विमागणितीय मूल्यांकन प्राप्त केलेले नाही. स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. २५ (ब) पहावी.
२. कंपनीने येणे बाकी रकमेची राज्य शासन तसेच इतर ऋणकोकडून पुष्टी उपलब्ध करुन दिलेली नाही. अशा विभागाकडून पुष्टी अभावी येणे बाकी रकमेच्या वहनक्षमतेच्या अचूकपणाबाबत खात्री करता येवू शकली नाही. (स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. ३९ (अ) पहावी.)
३. कंपनीने सुक्ष्म, लघु, मध्यम उपक्रमांच्या पुरवठाधारकांसोबत पत्रव्यवहाराची स्थिती आमच्या पडताळणीसाठी उपलब्ध करुन दिली नाही. त्याबाबत पुष्टीअभावी सुक्ष्म, लघु, मध्यम उपक्रमांचे पुरवठाधारकांना देणी आणि देय रकमांबाबत आम्ही टिपणी करु शकत नाही.
४. आवश्यकतेनुसार - कंपनी न्यायालयीन प्रकरणा संबंधाने आकस्मिक स्वरुपाच्या देयता निश्चित केलेल्या नाहीते. स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. ३७ (१) पहावी.

या बाबीसंबंधाने आमचे मतात फेरबदल झालेला नाही.

**क. वित्तीय विवरणपत्रे आणि त्यावर लेखा परीक्षकांच्या अहवाला व्यतिरिक्त इतर माहिती**

कंपनीचे संचालक मंडळ इतर माहिती तयार करण्यासाठी जबाबदार आहे. इतर माहितीमध्ये संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट केलेल्या माहितीसह संचालक मंडळाच्या अहवालाची सहपत्रे, व्यवसाय जबाबदारी अहवाल यांचा समावेश आहे परंतु त्यामध्ये वित्तीय विवरणपत्रे आणि त्यावरील आमचा लेखा परीक्षण अहवाल समाविष्ट नाही.

वित्तीय विवरणपत्रावरील आमचे मत इतर माहितीचा समावेश करत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकाराचे आश्वासन निष्कर्ष व्यक्त करत नाही.

वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणा संबंधाने, आमची जबाबदारी ही इतर माहितीचे वाचन करण्याची आहे आणि असे करतांना इतर माहिती स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राशी बरीच विसंगत आहे किंवा आमच्या लेखा परीक्षणा दरम्यान मिळविलेली आमची माहिती किंवा अन्यथा विशेषत: चुकीची असल्याचे दिसून येत आहे यावर विचार करावयाचा आहे. आम्ही केलेल्या कामाच्या आधारावर या इतर माहितीमध्ये महत्वपूर्ण असत्यकथन

असल्याबाबत आम्ही निष्कर्ष काढल्यास त्याबाबत वस्तुस्थिती प्रतिवेदित करणे आम्हाला आवश्यक आहे. यासंबंधाने आम्हाला कांहीही प्रतिवेदन करावयाचे नाही.

**ड. स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राकरिता व्यवस्थापनाची जबाबदारी**

भारतीय लेखांकन मानक (Ind AS) आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार स्वतंत्र वित्तीय स्थिती, स्वतंत्र वित्तीय कार्य, स्वतंत्र एकूण समावेशक उत्पन्न, स्वतंत्र भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र आणि कंपनीचे स्वतंत्र रोख प्रवाह विवरणपत्र याबाबत कंपनी अधिनियम २०१३ ("अधिनियम") च्या कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या बाबी संबंधाने खरी व वास्तववादी स्थिती दर्शविणारे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे. या जबाबदारीमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार कंपनीच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे लेखांकन दस्तऐवज ठेवणे तसेच फसवणूक आणि इतर अनियमितताचा तपास करणे व प्रतिबंध करण्यासाठी योग्य लेखा विषयक धोरणाची निवड करुन लागू करणे, वाजवी आणि दूरदर्शी प्राक्कलन करणे आणि निर्णय घेणे, फसवणूक आणि चुका यामुळे महत्वपूर्ण असत्यकथनापासून मुक्त आणि खरी व वास्तववादी स्थिती दर्शविणारे वित्तीय विवरणपत्रे तयार करणे व सादर करण्यासंबंधाने लेखाकंन दस्तऐवजाची अचुकता व पूर्तता याची खात्री करण्यासाठी पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची आखणी, अंमलबजावणी व पालन करणे इत्यादिचा सुध्दा अंतर्भाव होतो.

जोपर्यंत व्यवस्थापन एकतर समूहाचे परिसमापन करीत नाही किंवा कार्य करणे थांबवित नाही किंवा तसे केल्याशिवाय वास्तववादी विकल्प उपलब्ध राहत नाही तोपर्यंत कार्य चालू ठेवण्यासाठी (Going Concern) समूहाच्या कार्यकुशलतेचे निर्धारण करणे, कार्य चालू ठेवण्यासाठी संबंधित बाबीचे प्रकटन करणे आणि लेखांकन कार्य चालू ठेवण्याबाबत (Going concern) आधाराचा उपयोग करणे यासाठी स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना समूहात समाविष्ट कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे.

ते संचालक मंडळ कंपनीच्या आर्थिक अहवाल प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी देखील जबाबदार असतात.

**इ. लेखापरीक्षकांची जबाबदारी**

संपूर्ण स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे फसवणूक किंवा चुका यामुळे महत्वपूर्ण असत्यकथनापासून मुक्त आहेत यासंबंधाने वाजवी आश्वासन प्राप्त करणे आणि आमचे अभिप्राय अंतर्भूत असलेला लेखापरीक्षकांचा अहवाल निर्गमित करणे हे आमचे उद्देश आहेत. वाजवी आश्वासन हे आश्वासनाची वरिष्ट पातळी आहे. परंतु प्रमाण लेखांकन मानकानुसार केलेले लेखापरीक्षण अस्तित्वात असलेल्या महत्वपूर्ण असत्यकथनाचा नेहमी तपास करेल याची हमी नसते. असत्यकथन हे फसवणूक किंवा चुका पासून उद्‌भवू शकते आणि जर अशा स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे आधारावर उपयोगकर्त्याचे आर्थिक निर्णय वैयक्तिकरित्या, किंवा एकूणात, प्रभावित होणे अपेक्षित असल्यास सदर असत्यकथन हे महत्वपूर्ण मानण्यात येते.

प्रमाण लेखांकन मानकानुसार लेखापरीक्षणाचा भाग म्हणून आम्ही व्यावसायिक विवेकबुध्दीचा वापर करुन लेखा परीक्षणाचे शेवटपर्यंत व्यावसायिक संशयी वृत्तीचे पालन केले आहे. आम्हाला देखील :-

- चुका किंवा फसवणूक यामुळे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राच्या महत्वपूर्ण असत्यकथनाच्या जबाबदा-यांची ओळख व अंदाज आहे. अशा जबाबदा-यास प्रतियोगी स्वरुपाच्या लेखापरीक्षा कार्यपध्दतीची आखणी करुन त्याप्रमाणे लेखापरीक्षणाचे कार्य केले जाते, आणि आमच्या अभिप्रायाबाबत आधार तयार करण्यासाठी योग्य व पुरेसे लेखापरीक्षण पुरावे प्राप्त केले जातात. फसवणुकीमध्ये संगनमत, बनावट दस्तऐवज तयार करणे उद्देशपूर्वक अकृती, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रण अधिभावी ठरणे यासारख्या बाबी अंतर्भूत होत असल्याने चुकामंळे उद्भवणा-या जबाबदारीपेक्षा फसवणूकीपासून महत्वपूर्ण असत्यकथनाचा तपास न होण्याची जबाबदारी जास्त असते.

- परिस्थितीशी अनुरुप अशा योग्य लेखापरीक्षा कार्यपध्दतीची आखणी करण्यासाठी लेखापरीक्षणाशी संबंधित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची समज करुन घेण्यात येते. वित्तीय विवरण पत्राचे संबंधाने कंपनीकडे पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती अस्तित्वात आहे काय, अशा नियंत्रण पध्दतीची परिणामकारकता यासंबंधाने कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (३) (i) अंतर्गत आमचे मत व्यक्त करण्यासाठी आम्ही देखील जबाबदार आहोत.

- व्यवस्थापनाने उपयोगात आणलेल्या लेखाविषयक धोरणांची समुचितता, लेखांकन प्राक्कलने आणि केलेले संबंधित प्रकटन याचे मूल्यमापन केले जाते.

- कंपनीच्या कार्य चालू ठेवण्याचे क्षमतेबाबत शंका उपस्थित करणा-या घटना किंवा परिस्थितीचे संबंधाने विशेष स्वरुपाची अनिश्चितता अस्तित्वात असल्यास लेखापरीक्षण पुराव्याचे आधारावर व्यवस्थापनाने उपयोगात आणलेल्या लेखांकनाचे कार्य चालू ठेवण्याचे आधाराबाबतच्या समुचिततेवर निष्कर्ष काढण्यात येतो. विशेष स्वरुपाची अनिश्चितता अस्तित्वात असल्याबाबत आम्ही निष्कर्ष काढल्यास आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालात वित्तीय विवरणपत्रातील संबंधित प्रकटनाकडे लक्ष वेधणे आम्हाला आवश्यक असते किंवा जर असे प्रकटन अपर्याप्त असेल तर आमचे अभिप्रायात दुरुस्ती करावी लागते. आम्ही काढलेले निष्कर्ष आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालाचे दिनांकापर्यंत लेखापरीक्षणातील प्राप्त पुराव्यावर आधारित आहेत. तथापि भविष्यातील घटना किंवा परिस्थिती समूहाचे चालू असलेले कार्य (Going concern) बंद करण्यास कारणीभूत ठरु शकते.

- स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे प्रकटनासह एकूण सादरीकरण, संरचना आणि आशय तसेच स्वतंत्र विवरणपत्रे महत्वाचे व्यवहार आणि घटनांचे प्रतिनिधीत्व अशा पध्दतीने करतात की, ज्यामुळे वाजवी सादरीकरण साध्य होते, याबाबत मूल्यमापन करण्यात येते.

भौतिकता हा स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रातील असत्यकथनाचा परिणाम आहे, ज्यामुळे वैयक्तिकरित्या किंवा एकूणात वित्तीय विवरणपत्राची संमजसपणे चांगली माहिती असलेल्या उपयोगकर्त्याचे आर्थिक निर्णय प्रभावित होऊ शकतात. आम्ही परिणामात्मक भौतिकता विचारात घेतो आणि उपरोक्त संयुक्तपणे नियंत्रित संस्थाच्या संबंधाने अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोटकलम ३ व ११ चा संबंध केवळ अशा लेखापरीक्षित विवरणपत्रावर पूर्णपणे आधारित आहे. केलेल्या कामावरील आमचा विश्वास, इतर लेखापरीक्षकांचे अहवाल आणि

व्यवस्थापनाव्दारे प्रमाणित वित्तीय विवरणपत्रासंबंधी वरील बाबीसंबंधाने स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रावरील आमचा अहवाल आणि खाली दिलेल्या विधीविषयक आणि विनियामक आवश्यकता या बाबी संबंधाने स्वतंत्र वित्तीय विवरणावरील आमचे अभिप्रायात बदल नाही. ह्या बाबी संबंधाने आमचे मत बदललेले नाही.

आमच्या लेखापरीक्षणात आम्ही इतर बाबी बरोबरच अभिन्न मानलेल्या अंतर्गत नियंत्रणातील महत्वपूर्ण त्रुटीसह लेखापरीक्षणाची नियोजित व्याप्ती आणि वेळ तसेच लेखापरीक्षणाचे महत्वपूर्ण निष्कर्षासंबंधाने नियमनाचा कार्यभार असलेल्या सोबत संवाद साधतो.

**फ. इतर विधी विषयक आणि विनियामक आवश्यकतावर अहवाल**

१. अधिनियमाच्या कलम १४३ चे पोटकलम ११ अन्वये केंद्र शासनाव्दारे निर्गमित कंपनी (लेखा परीक्षकांचा अहवाल) आदेश २०१६ ('आदेश') नुसार आवश्यक असलेल्या सदर आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मधील विनिर्दिष्ट बाबीसंबंधाने निवेदन आम्ही सहपत्र 'अ' मध्ये देत आहोत.

२. कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३(५) अंतर्गत आवश्यकतेनुसार, लेखापरीक्षणाच्या सुचविलेल्या पध्दतीचे अनुपालन करुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे व्दारा निर्गमित निर्देशावरील निवेदन आम्ही सहपत्र 'क' मध्ये देत आहोत.

३. कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (३) मधील आवश्यकतेनुसार आम्ही प्रतिवेदन करतो की:

**अ)** महत्वपूर्ण बाबीसंबंधाने आमच्या अभिप्रायास अधिन राहून, आमच्या माहिती आणि समजुतीप्रमाणे लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्ही मागितले व ते प्राप्त केले आहेत.

**ब)** आमच्या मते आम्ही केलेल्या लेखापुस्तकाचे तपासणीवरुन कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य ती लेखापुस्तके कंपनीव्दारे ठेवण्यात आली आहेत असे दिसून येते.

**क)** या अहवालाशी संबंधित स्वतंत्र ताळेबंद, स्वतंत्र नफातोटा पत्रक आणि स्वतंत्र रोख प्रवाह विवरणपत्र यांचा ह्या अहवालाशी संबंधित स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी ठेवलेल्या संबंधित लेखापुस्तकाशी मेळ आहे.

**ड)** आमच्या मते भारतीय लेखांकन मानक १९ नुसार आवश्यक असल्याप्रमाणे प्रकटन आवश्यकतेचे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राचे टिपणी क्र. २५ (ब) नुसार अपालनाचे अधिन राहून उपरोक्त स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रे अधिनियमाच्या कलम १३३ अंतर्गत विनिर्दिष्ट लेखांकन मानकांचे अनुपालन करीत आहे. कंपनी (भारतीय लेखांकन मानके) नियम २००५ सह सुधारीत केल्याप्रमाणे वाचावे.

**ई)** दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संचालकांकडून मिळालेल्या लेखी निवेदनाच्या आधारावर संचालक मंडळाने अभिलिखित केल्याप्रमाणे संचालक म्हणून नियुक्त

केलेल्या संचालकापैकी दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी कोणीही संचालक कंपनी अधिनियम २०१३ कलम १६४(२) च्या अटींनुसार अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

**फ)** कंपनीच्या आर्थिक प्रतिवेदनावर पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने आणि अशा नियंत्रणाचे प्रभावी अंमलबजावणी संबंधाने आमचा सहपत्र 'ब' मधील स्वतंत्र अहवाल पहावा.

**ग)** आमच्या मते दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीने आपल्या संचालकांना अधिनियमाच्या कलम १९७ मधील तरतूदीनुसार अनुसूची V सह वाचल्यास, व्यवस्थापकीय पारिश्रमिकाचे शोधन केले / तरतूद केली आहे.

४. कंपनी (लेखापरीक्षा व लेखापरीक्षक) नियम २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात अंतर्भूत करावयाच्या इतर बाबीसंबंधाने आमच्या मते आणि आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार,

i) कायद्याने आवश्यक असल्यानुसार न्यायालयीन प्रकरणाचे संबंधाने प्रलंबित खटल्याचा लेख्यावरील प्रभाव कंपनीने निश्चित केलेला नाही. स्वतंत्र वित्तीय विवरणत्राचे टिपणी क्र. ३७ (१) कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

ii) कंपनीकडे विशेष अंदाजित नुकसान होण्याजोगे व्युत्पन्न करारासह कोणतेही दिर्घमुदती करार नाहीत.

iii) गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीत स्थानांतरीत करावयाच्या रकमेचे स्थानांतरण करण्यास कंपनीव्दारे विलंब झालेला नाही.

iv) **(अ)** व्यवस्थापनाने अभिवेदन केले आहे की, त्यांच्या माहिती आणि विश्वासानुसार लेख्याचे टिपणीत प्रकटन केल्याव्यतिरिक्त कंपनीने कोणास किंवा कोणत्याही इतर व्यक्ती किंवा विदेशी संस्थासह (मध्यस्थ) इतर संस्था यांना अभिलिखित किंवा अन्यथा मध्यस्थ, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही पध्दतीने ओळख असलेल्या किंवा कंपनीच्या वतीने इतर व्यक्ती किंवा संस्थाना (अंतिम लाभार्थी) उसनवारीने देईल किंवा गुंतवणूक करेल किंवा अंतीम लाभार्थींच्या वतीने कोणतीही हमी प्रतिभूती व तत्सम प्रकारात गुंतवणूक करेल याची जाणीव ठेवुन कोणताही निधी, अग्रिम, ऋण किंवा गुंतवणूक (कर्जाऊ निधीतून किंवा भाग प्रव्याजी किंवा इतर अन्य स्त्रोत किंवा निधीचे प्रकारातून) केलेला नाही.

**(ब)** व्यवस्थापनाने अभिवेदन केले आहे की, त्यांच्या माहिती व विश्वासाप्रमाणे लेख्याचे टिपणीत प्रकटन केल्या व्यतिरिक्त कंपनीला कोणतीही व्यक्ती किंवा विदेशी संस्थासह (निधी पुरविणारे पक्षकार) संस्था यांचेकडून अभिलिखित किंवा अन्यथा कंपनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष इतर व्यक्ती किंवा संस्था यांना उसनवारीने देईल किंवा गुंतवणूक करेल कोणत्याही पध्दतीने ओळख असलेल्या किंवा निधी पुरविणाऱ्या पक्षकाराच्या वतीने ("अंतिम लाभार्थी") किंवा अंतिम लाभार्थींच्या वतीने कोणतीही हमी, प्रतिभूती किंवा तत्सम प्रकारात गुंतवणूक करेल याची जाणीव ठेवून कोणताही निधी कंपनीला प्राप्त झालेला नाही.

**(क)** सांयुक्तिक आणि समर्पक मानण्यात आलेल्या अशा लेखा परीक्षा पध्दतीवर आधारित परिस्थितीत नियम ११ (इ) चे उपकलम (i) आणि (ii) अंतर्गत उपरोक्त

(अ) आणि (ब) अंतर्गत केलेले अभिवेदन यात कोणतेही विशेष असत्यकथन अंतर्भूत आहे असा आम्ही विश्वास ठेवण्यास आमचे काहीही निर्दशनास आलेले नाही.

v) दिनांक ०१-११-२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता रू. ७०.०० लक्ष लाभांष मंजूर करण्यात आला, त्याचे शोधन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

vi) त्यानंतर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता रू. ३२७.५० लक्ष आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता रू. २७५.०० लक्ष लाभांष अनुक्रमे दिनांक ३०-०५-२०२३ आणि २७-०९-२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आला व त्याचे शोधन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQY6729**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHN1189**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

## लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - अ
## (आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०२२-२३

## (फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेडच्या सभासदांना प्रेषित केलेल्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रावरील आमचे सम दिनांकाचे अहवालातील निर्दिष्ट)

१) (अ) (अ) संपत्ती, यंत्र आणि उपकरणे यांचे संख्यांत्मक तपशील व ठिकाण यासह पूर्ण तपशील दर्शविणारे उचित दस्तऐवज कंपनीने ठेवले आहेत.

ब) कंपनीकडे कोणतीही अमूर्त संपत्ती नाही. परिणामतः आदेशाचे कलम ३ (१) (अ) (ब) कंपनीला लागू नाही.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर संपत्ती, यंत्रे आणि उपकरणे यांची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने उचित कालांतराने केली आहे. अशा पडताळणीत विशेष तफावत निर्दशनास आलेली नाही.

(क) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर वित्तीय विवरणपत्रात दर्शविलेल्या सर्व अचल संपत्तीचे हक्क विलेख (जेथे कंपनी पट्टेदार आहे आणि भाडेपट्टयाचे करारपत्र पट्टेदाराचे नांवे करण्यात आले आहे त्या व्यतिरिक्त) खालील संपत्ती वगळता कंपनीच्या नावे आहेत.-

| **संपत्तीचे वर्णन** | **सकल वहनक्षम मूल्य रू. लाखात** | **ज्याचे नांवे धारण केले आहे** | **प्रवर्तक संचालक किंवा त्यांचे नातेवाईक किंवा कर्मचारी** | **धारण केलेले कालावधी उचित तेथे परिक्षेत्र नमूद करावे** | **कंपनीच्या नांवे धारण केले नसल्याबाबतची कारणे** |
|---|---|---|---|---|---|
| ईमारती आर.सी.सी. बांधकामे | १०८२.९५ | - | नाही | सुरूवातीपासून | ईमारतीचे बांधकाम वनजमिनीवर करण्यात आले आहे. |
| ईमारती आर.सी.सी. शिवाय बांधकामे | ९३४.०६ | - | नाही | सुरूवातीपासून | ईमारतीचे बांधकाम वनजमिनीवर करण्यात आले आहे. |

(ड) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर कंपनीने आपल्या संपत्ती यंत्रे आणि उपकरणे (संपत्तीच्या वापराच्या अधिकारासह) किंवा अमूर्त संपत्तीचे या वर्षात पुनर्मूल्यांकन केलेले नाही. परिणामतः आदेशाचे कलम ३ (i) (ड) अंतर्गत प्रतिवेदन कंपनीला लागू नाही.

(ई) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, बेनामी व्यवहार (प्रतिबंध) अधिनियम १९८८ (१९८८ चे ४५) आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमानुसार कोणतीही बेनामी संपत्ती धारण करण्यासंबंधाने कोणतीही कार्यवाही सुरू झालेली किंवा प्रलंबित नाही.

२) (अ) आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, आमच्या मते व्यवस्थापनाने वस्तुसूचीची प्रत्यक्ष पडताळणी, उचित कालांतराने केली आहे. आमच्या मते व्यवस्थापनाने अशा पडताळणीसाठी ठरविलेले क्षेत्र व पध्दत योग्य आहे. व्यवस्थापनाने केलेल्या साठ्याचे प्रत्यक्ष पडताळणीत पुस्तकातील नोंदीच्या तुलनेत एकुणात वस्तूसुचीच्या प्रत्येक वर्गवारीत १०% किंवा अधिकची तफावत निर्देशनास आली नाही. तथापि कंपनीने आम्हाला कळविले आहे की, जैविक संपत्तीची प्रत्यक्ष पडताळणी कंपनीने केलेली नाही. (स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. २२ (फ) पहावी.)

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर वर्षभरात कोणत्याही वेळी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून चलसंपत्तीचे प्रतिभूतीचे आधारावर कंपनीला एकुणात रुपये पांच कोटी पेक्षा जास्त खेळते भांडवल मर्यादा मंजूर करण्यात आली नाही. त्यामुळे आदेशाचे कलम ३ (ii) (b) अंतर्गत प्रतिवेदन कंपनीला लागू नाही.

३) आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, या वर्षात कंपनीने प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जाचे स्वरुपात कंपन्या, भागिदारी संस्था मर्यादित देयता भागीदारी किंवा इतर पक्षकार यांना कोणतीही हमी, प्रतिभूती दिली नाही किंवा कर्ज किंवा अग्रिम मंजूर केले नाही किंवा अशा संस्थात गुंतवणूक केली नाही. परिणामत: आदेशाचे कलम ३ (iii) (अ), ३ (iii) (ब), ३ (iii) (क), ३ (iii) (ड), ३ (iii) (ई) आणि ३ (iii) (फ) च्या तरतूदी कंपनीला लागू नाहीत.

४) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार तसेच आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, कंपनीने ऋण, गुंतवणूक, हमी आणि प्रतिभूती यासंबंधाने कपंनी अधिनियम २०१३ च्या कलम १८५ व १८६ च्या तरतूदीचे अनुपालन केले आहे.

५) कंपनीने भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे निर्गमित निर्देशांतर्गत आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ७३ ते ७६ अंतर्गत तरतूदीनुसार समाविष्ट होणाऱ्या ठेवी किंवा रकमा ज्या ठेवी म्हणून मानण्यात येतात, स्विकृत केलेल्या नाहीत. परिणामत: आदेशाचे कलम ३ (v) कंपनीला लागू नाही.

६) व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार केंद्र शासनाने कंपनी अधिनियमाच्या कलम १४८ उपकलम (१) अंतर्गत परिव्यय अभिलेखे ठेवण्याबाबत विनिर्दिष्ट केलेले नाही.

७) (अ) आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, वस्तू व सेवा कर, भविष्य निधी, कर्मचारी राज्यविमा , आयकर, विक्रीकर, सेवाकर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मूल्यवर्धित कर, उपकर यासह सांविधिक देणी आणि कोणत्याही इतर सांविधिक देणी कंपनी समुचित प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे जमा करीत आहे. आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार दि. ३१ मार्च २०२३ रोजी अशा सांविधिक देणी देय झाल्याचे दिनांकापासून सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीता प्रलंबित नव्हत्या.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, खालील प्रकरणे वगळता कोणत्याही विवादामुळे जमा करण्यात आले नाही अशी उपकलम (अ) मध्ये निर्दिष्ट सांविधानिक देणी नाहीत.

| **कायद्याचे नाव** | **थकबाकीचे स्वरुप** | **रक्कम (रु. लाखात)** | **रकमेशी संबधित कालावधी** | **विवाद प्रलंबित असलेले मंच** |
|---|---|---|---|---|
| आयकर | आयकर | ४३.८२ | कर निर्धारण | आयकर आयुक्त (अ), नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अधिनियम, १९६१ | प्रकरणे | | वर्ष २०१३-१४ | |
| आयकर अधिनियम, १९६१ | आयकर प्रकरणे | ६१.८३ | कर निर्धारण वर्ष २०१४-१५ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |
| आयकर अधिनियम, १९६१ | आयकर प्रकरणे | ८८.६४ | कर निर्धारण वर्ष २०१७-१८ | आयकर आयुक्त (अ), नागपूर |

८) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, यापूर्वी आयकर अधिनियम १९६१ अंतर्गत कर निर्धारणात लेखापुस्तकात प्राप्ती म्हणून नोंद न झालेले कोणतेही व्यवहार या वर्षात प्राप्ती म्हणून सोडून दिलेले नाही किंवा प्रकटन केलेले नाही.

९) (अ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, सावकारास कर्जाची किंवा उसनवारी घेतलेल्या इतर रकमाची किंवा त्यावरील व्याजाची परतफेड करण्यास कंपनीने कसूर केलेला नाही.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, बँक किंवा वित्तीय संस्था किंवा सावकार यांचेकडून कंपनीला बुध्दीपरस्सर कसूरदार म्हणून घोषित करण्यात आलेले नाही.

(क) व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानूसार कंपनीने या वर्षात मुदती कर्जे घेतलेली नाही. परिणामतः आदेशाचे कलम ३ (ix) (क) लागू नाही.

(ड) व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानूसार आणि कंपनीच्या ताळबंदाचे एकूण तपासणीवरून आम्ही प्रतिवेदन करतो की, कंपनीद्वारे अल्पमुदती आधारावर उभारलेला निधी दिर्घमुदती प्रयोजनासाठी वापरलेला नाही.

(इ) आमच्या मते आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानूसार कंपनीने आपल्या सहाय्यक कंपन्या, संयुक्त उपक्रम किंवा सहयोगी यांच्या देयता भागविण्यासाठी कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांचेकडून कोणताही निधी घेतलेला नाही. परिणामतः कलम ३ (ix) (फ) लागू नाही.

(फ) आमच्या मते आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने सहाय्यक कंपनी, संयुक्त उपक्रम किंवा सहयोगी कंपन्यामधील प्रतिभूती तारण ठेवून या वर्षात ऋण उभारलेले नाही. परिणामतः कलम ३ (ix) (फ) लागू नाही.

१०) (अ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, या वर्षात कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक मागणीद्वारे किंवा पुढील सार्वजनिक मागणीद्वारे (ऋण विलेख यासह) रक्कम उभारलेली नाही. परिणामतः आदेशाचे कलम ३ (ix) (अ) लागू नाही.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर, कंपनीने या वर्षात भागाचे कोणतेही अधिमान्य आवंटन किंवा खाजगी वाटप

किंवा परिवर्तित ऋण पत्राचे (पूर्णत:, आंशिक किंवा वैकल्पिक) वाटप केलेले नाही. परिणामत: आदेशाचे कलम ३ (ix) (ब) लागू नाही.

१) (अ) कंपनीची लेखापुस्तके व दस्तऐवजाच्या तपासणीचे आधारावर आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीद्वारे किंवा कंपनीची कोणतीही फसवणूक झाल्याचे लेखापरीक्षण कालावधीत निदर्शनास आलेले नाही किंवा प्रतिवेदित करण्यात आले नाही.

(ब) आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार कंपनी नियम (लेखापरीक्षण व लेखापरीक्षक), २०१४ अंतर्गत विहित केल्याप्रमाणे कंपनी अधिनियमाच्या कलम १४३ उपकलम (१२) अंतर्गत लेखापरीक्षकाद्वारे प्रपत्र एडीटी-४ मध्ये केंद्रशासनाकडे प्रतिवेदन दाखल करण्यात आलेले नाही.

(क) व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार गंभीर नोंद घेण्यायोग्य (Whistle Blower) तक्रार कंपनीकडे प्राप्त झालेली नाही.

२) कंपनी निधी कंपनी नाही. परिणामत: आदेशाचे कलम ३ (xii) (अ),३ (xii) (ब) आणि ३ (xii) (क) लागू नाही.

३) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियमाच्या कलम १७७ व १८८ नुसार अनुपालन करून योग्य तेथे व तपशीलासह लागू असलेल्या लेखांकन मानकानुसार वित्तीय विवरणपत्रात संबंधित पक्षकारासोबत सर्व व्यवहारांचे प्रकटन करण्यात आले आहे.

४) (अ) आम्हाला पुरविलेली माहिती व स्पष्टीकरण तसेच आमच्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारावर कंपनीकडे व्यवसायाचे स्वरुप व व्याप्तीस अनुरूप अशी अंतर्गत लेखा परीक्षण व्यवस्था आहे.

(ब) लेखापरीक्षण कालावधी पर्यंतच्या दिनांकापर्यंत निर्गमित केलेले कंपनीचे अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल आम्ही विचारात घेतले आहेत.

५) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने संचालक किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्ती सोबत रोखीत नसलेले कोणतेही व्यवहार केलेले नाहीत, त्यामुळे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १९२ च्या तरतूदी कंपनीला लागू नाहीत.

६) (अ) आमच्या मते आणि आमच्या तपासणीनुसार भारतीय रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ (१९३४ चे कलम २) कलम ४५-आयए अंतर्गत कंपनीला नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. परिणामत: आदेशाचे कलम ३ (xvi) (अ) लागू नाही.

(ब) आमच्या मते आणि आमच्या तपासणीनुसार भारतीय रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ नुसार कंपनीने रिझर्व बँक ऑफ इंडिया कडून विधिग्राह्य प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही अबँकीय वित्तीय किंवा गृह वित्त कार्यविधीचे संचालन केलेले नाही. परिणामत: आदेशाचे कलम ३ (xvi) (b) लागू नाही.

(क) आमच्या मते आणि आमच्या तपासणीनुसार रिझर्व बँक ऑफ इंडियाने केलेल्या विनियमात निश्चित केल्यानुसार कंपनी कोअर इनव्हेंस्टमेंट कंपनी (Core Investemnt Company) नाही त्यानुसार आदेशाचे कलम ३ (xvi) (क) लागू नाही.

(ड) व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार समूहाचा भाग म्हणून कंपनीकडे एकापेक्षा अधिक केंद्रिय माहिती आयुक्त (CIC) नाहीत.

१७) आमच्या तपासणीचे आधारावर चालू वित्तीय वर्षात तसेच लगतच्या मागील वित्तीय वर्षात कंपनीला रोख नुकसान झालेले नाही.

१८) चालू वर्षात सांविधिक लेखापरीक्षकाचे त्यागपत्र नाही. परिणामतः आदेशाचे कलम ३ (xviii) लागू नाही.

१९) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि वित्तीय गुणोत्तर प्रमाण (Ratios), कालावधी तसेच वित्तीय संपत्तीची वसुली आणि वित्तीय देयतांच्या शोधनाच्या अपेक्षित तारखा यांचे आधारावर, संचालक मंडळ तसेच व्यवस्थापनाच्या योजना याबाबत आमची माहिती आणि गृहीतकासंबंधी पुराव्याचे आमचे तपासणीचे आधारावर ताळेबंदाचे दिवशी अस्तित्वात असलेल्या देयता ताळेबंदाच्या दिवसापासून एक वर्षाचे कालावधीत ज्यावेळी देय होतील त्यावेळी अशा देयता भागविण्यासाठी कंपनी समर्थ नाही अशी कोणतीहि महत्त्वपूर्ण अनिश्चितता लेखापरीक्षण अहवालाचे दिवशी अस्तित्वात आहे, असा विश्वास ठेवण्यासाठी असे काहीही आमच्या लक्षात आलेले नाही. तथापि आम्ही नमूद करतो की, हे कंपनीच्या भविष्यातील वर्धनक्षमतेचे आश्वासन नाही. आम्ही पुढे नमूद करतो की, आमचे प्रतिवेदन लेखापरीक्षण अहवालाचे दिनांकापर्यंतच्या वस्तुस्थितीवर आधारित आहे आणि ताळेबंदाचे दिवसापासून एक वर्षाचे कालावधीत ज्यावेळी देय होतील त्यावेळी अशा सर्व देयता कंपनीद्वारे चुकत्या करण्यात येतील याबाबत आम्ही कोणतीही हमी देत नाही किंवा आश्वासन देत नाही.

२०) (अ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर कार्यरत प्रकल्पाचे व्यतिरिक्त इतरांशी संबंधित अखर्चित रक्कम कंपनी अधिनियमाचे अनुसूची VII मध्ये विनिर्दिष्ट निधीला सदर अधिनियमाचे कलम १३५ उपकलम (५) दुसरे परंतुकाचे अनुपालन करुन वित्तीय वर्षाचे समाप्तीनंतर सहा महिन्याचे आत स्थानांतरीत केली आहे.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या दस्तऐवजाचे तपासणीचे आधारावर सदर अधिनियमाचे कलम १३५ (६) चे अनुपालन करुन कार्यरत प्रकल्पाशी संबंधित अखर्चित रक्कम वित्तीय वर्षाचे समाप्तीनंतर ३० दिवसाचे आंत विशेष लेख्यात स्थानांतरीत केली आहे.

(क) हा अहवाल स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रावर असल्यामुळे हे कलम लागू नाही.

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQY6729**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHN1189**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

## लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - ब
## (आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०२२-२३

**कंपनी अधिनियम २०१३ ("कायदा") कलम १४३ पोटकलम ३ चे उपकलम (i) अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर अहवाल**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेडच्या **("कंपनी")** दिनांक ३१ मार्च २०२३ रोजीच्या आर्थिक प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे त्याच दिवशी संपलेल्या वर्षाकरीता कंपनीच्या स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणासोबत आम्ही लेखापरीक्षण केले आहे.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणाकरिता व्यवस्थापनाची जबाबदारी :**

आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने (इंस्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊन्टट्स ऑफ इंडिया) भारतीय सनदी लेखापालाच्या संस्थेने (ICAI) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक टिपणीत नमूद केल्यानुसार कंपनीने आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे आधारे स्थापित केलेले अंतर्गत वित्तीय नियंत्रण सुस्थितीत ठेवण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदारीमध्ये कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे कंपनीच्या व्यवसायाचे सुस्थितीत व कार्यक्षम संचालनाची खात्री करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रण योजनेची आखणी, अंमलबजावणी व परिचलन, कंपनीच्या धोरणांचा अवलंब, संपत्तीची सुरक्षा, फसवणूक आणि चुकांचा प्रतिबंध आणि तपास, लेखाविषयक अभिलेखाची अचूकता व पूर्णत्व आणि विश्वसनीय वित्तीय माहितीची वेळेवर तयारी इत्यादिचा अंतर्भाव आहे.

**लेखापरीक्षकांची जबाबदारी :**

आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाचे आधारे आर्थिक प्रतिवेदनावरील कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधाने अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरीक्षणाबाबत भारतीय सनदी लेखापाल (ICAI) संस्थेव्दारे निर्गमित मार्गदर्शक टिपणीनुसार (''मार्गदर्शक टिपणी'') आणि कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (१०) अंतर्गत विहित केल्याचे मानण्यात आल्यानुसार, दोन्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरीक्षणास लागू असलेले तसेच दोन्ही भारतीय सनदी लेखापाल संस्थेने निर्गमित केलेले, अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणास लागू मर्यादेपर्यंत आम्ही आमचे लेखापरीक्षण केले आहे. त्यानुसार सदर मानके आणि मार्गदर्शक टिपणीत आवश्यक असल्याप्रमाणे आर्थिक प्रतिवेदनावर पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रण स्थापित असून त्याचे पालन करण्यात आले होते आणि असे नियंत्रण सर्व महत्वपूर्ण विषयात प्रभावीपणे चालू होते याबाबत वाजवी आश्वासन प्राप्त करण्यासाठी नैतीक मूल्याचे अनुपालन व लेखापरीक्षणाचे नियोजन करून लेखापरीक्षण पार पाडले आहे.

आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती पुरेशी असून प्रभावीपणे चालू आहे, यासंबंधाने लेखापरीक्षण पुरावा प्राप्त करण्यासाठी कार्यपध्दतीचा आमच्या लेखापरीक्षणात अंतर्भाव आहे. आमच्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणात आर्थिक प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची जाणीव प्राप्त करणे, महत्वपूर्ण उणीवा असल्यास जबाबदारीचे निर्धारण करणे आणि निर्धारित जबाबदारीवर आधारित अंतर्गत नियंत्रणाचे प्रभावीपणे पालन होत असल्याबाबत चाचणी व मूल्यमापनाचे संकल्पन करणे याचा अंतर्भाव आहे. निवड केलेली कार्यपध्दती लेखापरीक्षकांचे निर्णय तसेच वित्तीय विवरणपत्रे फसवणूक किंवा चुकामुळे महत्वपूर्ण असत्यकथन याबाबत जबाबदारीचे निर्धारण यावर अवलंबून आहे.

आर्थिक प्रतिवेदनावरील कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती संबंधाने आमच्या अभिप्रायाच्या आधारासाठी आम्ही पुरेसा आणि योग्य लेखापरीक्षण पुरावा प्राप्त केला आहे असा आम्हाला विश्वास आहे.

**आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ :**

सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार आर्थिक प्रतिवेदन आणि वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याची विश्वसनीयता बाह्य प्रयोजनासाठी वाजवी आश्वासन उपलब्ध करुन देण्यासाठी तयार केलेली आर्थिक प्रतिवेदनावरील कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण ही प्रक्रिया आहे. कंपनीच्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण यामध्ये अशी धोरणे व प्रक्रियाचा समावेश आहे की, १) व्यवहार अचूकपणे व योग्यप्रकारे प्रतिबिंबीत करणे आणि कंपनीच्या संपत्तीची विल्हेवाट यासंबंधाने वाजवी तपशीलासह अभिलेख ठेवणे, २) सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी आवश्यक असल्याप्रमाणे व्यवहाराची नोंद केल्याबाबत वाजवी आश्वासन उपलब्ध करुन देणे आणि व्यवस्थापन तसेच फक्त कंपनीचे व्यवस्थापन आणि संचालकाच्या प्राधिकार पत्रानुसार कंपनीची प्राप्ती आणि खर्च करण्यात येत आहेत आणि ३) वित्तीय विवरणपत्रावर महत्वपूर्ण परिणाम करणा-या कंपनीच्या संपत्तीचे अनधिकृत संपादन, वापर आणि विल्हेवाट याबाबत  वेळीच तपास करुन प्रतिबंध करणे यासाठी वाजवी आश्वासन उपलब्ध करुन देणे, असे धोरण व कार्यपध्दतीचा अंतर्भाव आहे.

**आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंगभूत मर्यादा :**

संगनमताची शक्यता किंवा अयोग्य व्यवस्थापन, नियंत्रणाचे अधिभावीकरण यासारख्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंगभूत मर्यादामुळे चुका किंवा फसवणुकीमुळे महत्वपूर्ण असत्यकथन घडून तपास न होण्याची शक्यता असते. तसेच परिस्थितीतील बदल, धोरण किंवा प्रक्रियेच्या अनुपालनाचा दर्जा इत्यादि मुळे आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत नियंत्रणाचे भविष्यकालीन कालावधीच्या प्रक्षेपणाचे कोणतेही मूल्यांकन अपूर्ण राहून बिघडण्याची शक्यता असते.

**अभिप्राय :**

आमच्या मते कंपनीकडे सर्व महत्वपूर्ण बाबतीत आर्थिक प्रतिवेदनावरील पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दत अस्तित्वात आहे आणि भारतीय सनदी लेखापालाच्या संस्थेने निर्गमित केलेल्या आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील मार्गदर्शक टिपणीत नमूद केल्यानुसार अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेता कंपनीने आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने कसोटीवर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रण स्थापित केले असून असे अंतर्गत वित्तीय नियंत्रण दि.३१.०३.२०२३ रोजी प्रभावीपणे कार्यरत होते.

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQY6729**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHN1189**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

## स्वतंत्र लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - क
## (आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०२२-२३

### कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत कंपन्याचे लेखापरीक्षणाकरिता निर्देश व उपनिर्देशानुसार अहवाल

| अ.क्र. | तपशील / निर्देश | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीकडे माहिती तंत्रज्ञान यंत्रणे मार्फत लेखाविषयक सर्व व्यवहाराचे संस्करण करण्यासाठी प्रणाली आहे किंवा कसे? असल्यास माहिती तंत्रज्ञान यंत्रणेबाहेरील लेखाविषयक व्यवहार संस्करणाचे वित्तीय भारासह लेख्याचे साकल्यावर अपेक्षित भार जर कांही असल्यास नमूद करण्यात यावे. | कंपनीव्दारे हस्त (Manual) लेखापुस्तके ठेवण्यात येत आहेत व लेखांकन प्रयोजनासाठी माहिती तंत्रज्ञान यंत्रणेचा वापर करण्यात येत नाही. |
| २ | सावकाराने दिलेल्या कर्जाची परतफेड करण्यास कंपनी असमर्थ असल्यामुळे विद्यमान कर्जाची पुनर्रचना किंवा ऋण / कर्ज / व्याज इत्यादिचे निर्लेखन / माफीची प्रकरणे आहेत किंवा कसे? असल्यास आर्थिक प्रभाव नमूद करण्यात यावा. अशा प्रकरणाचे योग्यरितीने लेखांकन करण्यात आले आहे किंवा कसे? (सावकार शासकीय कंपनी असल्यास अशा प्रकरणी हे निर्देश सावकार कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकांना सुध्दा लागू आहेत) | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार सावकाराने दिलेल्या कर्जाची परतफेड करण्यास कंपनी असमर्थ असल्यामुळे अशाप्रकारची माफी / निर्लेखनाची प्रकरणे नाहीत. |
| ३ | केंद्र / राज्य शासन किंवा त्यांच्या यंत्रणेकडून विनिर्दिष्ट योजनांसाठी प्राप्त / प्राप्य निधीचे (अनुदान / अर्थसहाय्य) त्यातील शर्ती व अटीनुसार योग्यरितीने लेखांकन करण्यात आले आहे / वापरण्यात आले आहे किंवा कसे? विचलनाच्या प्रकरणांची यादी देण्यात यावी. | माहितीनुसार केंद्र / राज्य शासन किंवा त्यांच्या यंत्रणेकडून विनिर्दिष्ट योजनासाठी प्राप्त / प्राप्य निधीचे शर्ती व अटीनुसार योग्यरितीने लेखांकन करण्यात आले आह / वापरण्यात आले आहे. |
| | **क्षेत्र विशिष्ट रोपवन** | |
| १ | आर्थिक आयुष्यमानानंतर तोड केलेल्या रबर रोपवनाकरिता लेखांकनाचे धोरण इतर समान उद्योगात स्विकृत केलेल्या प्रथेनुसार आहे काय? व्यवस्थापनाने उपउत्पादन/टाकाऊ माल प्रमाणपध्दती-च्या मर्यादेत आहे याबाबत सनियंत्रण केले आहे काय? | कंपनी रबर रोपवनाचे कार्यविधीत गुंतलेली नाही. |
| २ | पुनर्रोपवन संचिती चा वापर उद्देशित प्रयोजनासाठी करण्यात आला आहे आणि पर्यायी वनीकरणाच्या संबंधित विधीविधानांतर्गत आवश्यकताचे पालन झाले आहे काय? | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कोणत्याहि विधीविधानांतर्गत निर्मित पुनर्रोपवन संचिती कंपनीने ठेवलेली नाही. |
| ३ | लेखा परीक्षण अहवालात नमूद नफा/तोटा कंपनीच्या नफातोटा विवरणपत्राप्रमाणे आहे काय? | होय, लेखा परीक्षण अहवालात नमूद करण्यात आलेला नफा हा कंपनीच्या नफातोटा विवरणपत्राशी जुळत आहे. |
| ४ | वन विभागास स्वामित्व शुल्क परिगणनेचा आधार व वेळेवर शोधनाची तपासणी करण्यासाठी कंपनीकडे योग्य पध्दत आहे काय? स्वामित्व शुल्काचे शोधन करण्यास विलंब झाल्यामुळे राज्य शासनास प्रदान केलेल्या व्याजाबाबत अभिप्राय देण्यात यावे. | आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार स्वामित्व शुल्काचे शोधनासाठी कंपनीने वन विभागासोबत करार केलेला नाही. |
| ५ | ईमारती मालाच्या विक्रीतील अडचणी टाळण्यासाठी मागणी व पुरवठ्यातील अंतर कमी करण्यासाठी वस्तुसूची व्यवस्थापन प्रभावी आहे काय? | मागणी व पुरवठा याकरिता शासनाव्दारे तयार केलेल्या नियमांचे पालन करणे कंपनीला बंधनकारक आहे. चालू वर्षात ईमारती मालाची विपत्तीदायक विक्री झालेली नाही. |
| ६ | ठराविक कार्यविधी राबविण्यासाठी केंद्र शासन / | आम्हाला दिलेल्या माहितीप्रमाणे आणि |

| | | |
|---|---|---|
| | राज्य शासन किंवा त्यांच्या यंत्रणेकडून प्राप्त झालेले अनुदान / अर्थसहाय्य परिवर्तित प्रकरणाचा अहवाल. | स्पष्टीकरणानुसार केंद्र शासन / राज्य शासन किंवा त्यांच्या यंत्रणाकडून प्राप्त अनुदान / अर्थसहाय्य परिवर्तित प्रकरणे निदर्शनास आलेली नाहीत. |
| | **सामान्य** | |
| ७ | कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) कार्यविधीबाबत प्रतिवेदन आणि प्रकटन संदर्भाने कंपनी कायद्यातील तरतूदींचे पालन करण्यात आले आहे काय ? याबाबत तपासणी करावी. | कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) कार्यविधीच्या कंपनी अधिनियम २०१३ चे संदर्भाने प्रतिवेदन व प्रकटनाबाबत तरतूदीचे पालन करण्यात आले असल्याचे आम्हास आढळून आले आहे. टिपणी क्र. २६ पाहावी. |

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQY6729**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHN1189**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित**
**सीआयएन : यु४५२००एमएच१९७४एसजीसी ०१७२०६**

**दिनांक ३१.०३.२०२३ रोजीचा स्वतंत्र ताळेबंद**

(रु. लाखात)

| | तपशील | टिपणी क्र. | चालू प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२३ अखेरचे आकडे | मागील प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२२ अखेरचे आकडे |
|---|---|---|---|---|
| | **संपत्ती :-** | | | |
| १ | **अचल संपत्ती** | | | |
| | अ) संपत्ती, यंत्रे व उपकरणे | १ अ | १६९१.३६ | १७४०.३१ |
| | ब) प्रगतीपथावरील भांडवली कामे | १ ब | २९.०९ | १९.३१ |
| | क) जैविक संपत्ती | ४ | १३१८६१.४९ | १२८८४७.६८ |
| | ड) वित्तीय संपत्ती | | | |
| | i) गुंतवणूक | २ | - | - |
| | ii) ऋण | २ अ | ७१०.५४ | ७१३.४४ |
| | ई) लांबणीवर टाकलेली कर संपत्ती (निव्वळ) | ३१ | ९६.४३ | ६९.५० |
| | फ) इतर अचल संपत्ती | ३ | १२७९४.५९ | २५९३६.४१ |
| | | | **१४७१८३.५०** | **१५७३२६.६५** |
| २ | **चल संपत्ती** | | | |
| | अ) वस्तुसूची | ४ अ | २३५९४.१५ | १३२६७.३७ |
| | ब) वित्तीय संपत्ती | | | |
| | i) व्यापारी येणे | ५ | ४७४०.१० | ६४६५.६१ |
| | ii) रोख आणि रोख सममूल्य | ६ | १२६९३.७८ | ३३२५.४२ |
| | iii) बँकेतील शिल्लक वरील (ii) व्यतिरिक्त | ६ अ | ४४१५४.०० | ३६६१६.०० |
| | iv) ऋण | ७ | २०९२.६३ | २०२८.९१ |
| | v) इतर वित्तीय संपत्ती | ७ अ | १४९६.३८ | ८३४.६१ |
| | क) इतर चल संपत्ती | ८ | २१७७.४० | ८७०.८९ |
| | ड) चालू कर संपत्ती (निव्वळ) | १४ | १५४.९३ | १२९८.३३ |
| | | | **९११०३.३७** | **६४७०७.१४** |
| | **एकूण** | | **२३८२८६.८७** | **२२२०३३.७९** |
| | **समता भाग आणि देयता** | | | |
| १ | **समता भाग** | | | |
| | अ) समता भाग भांडवल | ९ | ३२३१२.३५ | ३२३१२.३५ |
| | ब) इतर भाग / संचिती | १० | १७५०५४.७२ | १६०४२२.८९ |
| | | | **२०७३६७.०७** | **१९२७३५.२४** |
जैविक संपत्तीशी संबंध असलेल्या कृषी विषयक कार्यविधी अणि कापणीचे ठिकाणी असलेले कृषी उत्पादन/वनोपज यांना भारतीय लेखांकन मानक (Ind AS-2) (वस्तुसूची) चे परिच्छेद ३ (अ) अन्वये विनिर्दिष्टपणे वगळण्यांत आल्यामुळे सदर लेखांकन मानक कंपनीला लागू नाही.

वस्तुसूची मध्ये अंतर्भूत प्रगतीपथावरील कामांचे मुल्यांकन परिव्यय मूल्यावर आधारीत आहे. कापणी प्रक्रियेच्या परिणाम स्वरुप प्राप्त उत्पादन म्हणजे विक्रीसाठी तयार वनोपज मालाच्या संवरण स्कंधाचे मूल्यांकन निव्वळ वसूलीयोग्य मूल्य/रास्त मूल्याने करण्यांत आले असून अशा मूल्यातील बदल त्या बदलाच्या कालावधीच्या नफा किंवा तोटयात विचारात घेण्यांत आला आहे.

**डब्लू) प्रतिभाग मिळकत**

समता भागधारकांचा संबंध असलेल्या चालू वर्षाकरिता निव्वळ नफा किंवा तोटयास या वर्षात शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यांत आली आहे.

**एक्स) प्रस्तावित लाभांश**

वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता प्रलंबित असल्याने संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लाभांशाची तरतूद लेख्यात करण्यांत आली नाही. भागधारकांनी मान्यता दिलेल्या दिनांकास भागावरील लाभांशाची नोंद देयता म्हणून करण्यांत येते.

**टिपणी - २३ सहाय्यक कंपनीमध्ये गुंतवणूक**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड (FDCM Limited) ने दिनांक ३१.०३.२०२३ रोजी एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड (पूर्वी एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड म्हणून ओळखली जाणारी) मध्ये रु. १०.०० लाख (प्रत्येकी रु. 10 दर्शनी मूल्याचे १,००,००० भाग) १००% समता भाग धारण केले आहेत. कंपनीने सहाय्यक कंपनीत केलेली गुंतवणूक महाराष्ट्र शासनाकडून सदर प्रकल्पासाठी प्राप्त निधीतून करण्यांत आली असल्यामुळे एक रुपया सांकेतिक मूल्याने अभिलिखित करण्यांत आली आहे. (टिप्पणी क्रमांक 2 पहावी)

**टिपणी - २४ अचल संपत्तीचे हक्क विलेख**

पूर्ण स्वामित्व असलेल्या जमिनीवरील कंपनीच्या मालकीच्या अचल संपत्तीचे हक्क विलेख (Title Deeds) कंपनीच्या नावे आहेत. तथापि वन विभाग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे नियत भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीवर बांधलेल्या/हस्तांतरीत ईमारतीच्या स्वरुपातील अचल संपत्तीची मालकी जरी कंपनीकडे असली तरी हक्क विलेख कंपनीच्या नावाने नाहीत. तपशील खालीलप्रमाणे आहे.

| संपत्तीचे वर्णन | सकल वहनक्षम मूल्य (रु. लाखात) | हक्क विलेख धारण केलेल्याचे नांव | हक्क विलेखधारक प्रवर्तक/संचालक किंवा प्रवर्तकाचे/ संचालकाचे नातेवाईक किंवा प्रवर्तक/ संचालक यांचे कर्मचारी आहेत किंवा कसे ? | कोणत्या दिनांकापासून संपत्ती धारण केल्या आहेत | कंपनीच्या नावे धारण न करण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| आर सी सी फ्रेम बांधकाम | 1082.95 (1082.95)* | कोणी नाही | नाही | सुरवातीपासून | ** |
| आर सी सी फ्रेम शिवाय बांधकाम | 934.06 (951.51)* | कोणी नाही | नाही | सुरवातीपासून | ** |

* मागील वर्षातील रक्कम दर्शवितात.

** ईमारती बांधकामे वनजमिनीवर असल्यामुळे हक्क विलेख एफडीसीएम लिमी, चे नावाने करता येत नाही.

स्थिर संपत्ती नोंदवही ठेवण्यांत आली आहे. तथापी संपत्तीला अनुक्रमिक कोडींग/लेबल लावणे (टॅगींग) ई. कामे प्रगतीपथावर आहेत.

नाशिक प्रदेशातील तत्कालीन यावल विभागातील चोपडा येथील रु. 21.90 लाख (मागील वर्षी रुपये 21.90 लाख) रक्कमेची जमीन व ईमारती वन विभागाच्या ताब्यात आहेत. ही संपत्ती पूर्णपणे अवक्षयीत झालेली आहे. यासंबंधीचा मोबदला किंवा इतर काही असल्यास त्याबाबत अजून अंतीम निर्णय झालेला नाही, आणि त्यामुळे सदर संपत्तीची मालकी अजूनही कंपनीकडे आहे.

**टिपणी - २५ सेवा उपदान व रजा रोखीकरण लाभ**

**अ) एफडीसीएम लिमी, कर्मचा-यांचे संबंधाने सेवाउपदान** :

(रक्कम लाखात)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **गृहीतक (Assumption)** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | सवलत दर | ७.२५% | ७.००% |
| | वेतन वृध्दी | ७.००% | ७.००% |
| २ | **दायित्वाचे वर्तमान मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्षाच्या सुरुवातीस दायित्वाचे वर्तमान मूल्य | ४२७६.८० | ३८७७.६५ |
| | या वर्षात सुरुवातीचे समायोजन | -- | १४.८९ |
| | व्याज खर्च | २९९.३८ | २७२.४७ |
| | चालू सेवा खर्च | २३१.१६ | २०७.८१ |
| | शोधन केलेले लाभ | (९५८.८३) | (६७८.२८) |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | ३८९८.९८ | ४२७६.८० |
| | | | |
| ३ | **योजनांतर्गत मालमत्तेच्या रास्त मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४७०९.४९ | ४४२४.१५ |
| | या वर्षात सुरुवातीचे समायोजन | -- | १५.२४ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | ३१७.१४ | ३००.७७ |
| | अंशदान | २७२.४६ | ६४७.६० |
| | शोधन केलेले लाभ | (९५८.८३) | (६७८.२८) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर विमागणितीय | निरंक | निरंक |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४३४०.२७ | ४७०९.४९ |
| | | | |
| ४ | **योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य दर्शविणारा तक्ता** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४७०९.४९ | ४४२४.१५ |
| | या वर्षात सुरुवातीचे समायोजन | -- | १५.२४ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीची प्रत्यक्ष प्राप्ती | ३१७.१४ | ३००.७७ |
| | अंशदान | २७२.४६ | ६४७.६० |
| | शोधन केलेले लाभ | (९५८.८३) | (६७८.२८) |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४३४०.२७ | ४७०९.४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | निधीची स्थिती | ४४१.२८ | ४३२.६९ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अंदाजित प्राप्ती पेक्षा जास्तीची प्राप्ती | निरंक | निरंक |
| | (प्रत्यक्ष प्राप्ती दर = अंदाजित प्राप्ती दर वार्षिक नूतनीकरण दिनांक ३१ मार्च रोजी आल्यामुळे) | | |
| | | | |
| **५** | **विचारात घेतलेले विमागणितीय प्राप्ती/नुकसान** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | (४२.४७) | (५८२.२४) |
| | वर्षाकरिता विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान योजनेअंतर्गत संपत्ती | निरंक | निरंक |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | या वर्षातील विचारात घेतलेली विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | | | |
| **६** | **ताळेबंद आणि नफातोटयाचे विवरणपत्रात विचारात घ्यावयाची रक्कम** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | ३८९८.९८ | ४२७६.८० |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४३४०.२७ | ४७०९.४९ |
| | निधीची स्थिती | ४४१.२८ | ४३२.६९ |
| | ताळेबंदात विचारात घेतलेली निव्वळ संपत्ती/(देयता) | ४४१.२८ | ४३२.६९ |
| | | | |
| **७** | **नफातोटयाच्या विवरणपत्रात विचारात घेतलेले खर्च** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | चालू सेवा मूल्य | २३९.१६ | २०७.८१ |
| | व्याज खर्च | २९९.३८ | २७२.४७ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (३१७.१४) | (३००.७७) |
| | वर्षात विचारात घेतलेले निव्वळ विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | नफा तोटयाचे विवरणपत्रात विचारात घेतलेला खर्च | २६३.८७ | ७६१.७६ |

**ब)** कर्मचा-यांचे रजा रोखीकरण निवृत्ती लाभ भारतीय आयुर्विमा महामंडळाशी संलग्न करण्यांत आले आहे. तथापि यासंबंधाने प्रकटीकरण करण्यासाठी आवश्यक माहिती पुरविण्यास आयुर्विमा महामंडळाने असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे लेखांकन मानक 19 नुसार प्रकटीकरण करता येवू शकले नाही.

**टिपणी - २६ कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर)**

कंपनीने कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायीत्व कार्यविधी (CSR) व्यवस्थापनासाठी "एफडीसीएम सी एस आर" ट्रस्टची स्थापना केली आहे. सीएसआर खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| तपशील | ३१ मार्च २०२३ रोजी | ३१ मार्च २०२२ रोजी |
|---|---|---|
| चालू वर्षात खर्च करावयाची रक्कम | १९२.०० | १९८.०० |
| मागील वर्षातील उपलब्ध रक्कम | ६४.७९ | -- |
| एकूण | **२५६.७९** | **१९८.००** |
| चालू वर्षात एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट ला केलेल्या अंशदान स्वरुपात खर्च | -- | -- |
| सीएसआर खर्च | १५९.४० | १२८.८७ |
| मागील वर्षाच्या अखर्चीत शिल्लकमधून झालेला खर्च | ६४.७९ | -- |
| 'एफडीसीएम अखर्चित सीएसआर' या स्वतंत्र बँक खात्यात स्थानांतरीत रक्कम | ३६.९० | ६४.७९ |
| दिनांक २७.०७.२०२२ रोजी प्रधानमंत्री सहाय्यता निधीस शोधन केलेली रक्कम | -- | १०.०० |
| **एकूण** | **२६१.०९** | **२०३.६६** |

**टिपणी - २७ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६**

कंपनीकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारीत दि. ३१.०३.२०२३ रोजी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६ अंतर्गत नोंदणीकृत कोणतेही सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंत्राटदार / पुरवठाधारक व सेवा देणारे नाहीत.

**टिपणी - २८ खंड प्रतिवेदन**

कंपनीची मुख्य कार्यविधी ही रोपवन निर्मिती असल्यामुळे लेखांकनासंबंधी स्वतंत्र प्रतिवेदन देण्यायोग्य खंड नाही.

**टिपणी - २९ संबंधित पक्षकार व्यवहार प्रकटन**

**(अ) संबंधित पक्षकारांची यादी**

**(I) सहाय्यक कंपनी**

एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड (पूर्वी एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड नावाने ओळखली जाणारी)

(II) **व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईक**

**व्यवस्थापकीय संचालक**

| वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|
| श्री एन वासुदेवन, माजी व्यवस्थापकीय संचालक | श्री एन वासुदेवन, व्यवस्थापकीय संचालक |
| श्री के.पी. सिंह, माजी व्यवस्थापकीय संचालक | |
| श्री विकास गुप्ता, व्यवस्थापकीय संचालक | |

**संचालक**

| वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|
| मान. श्री सुधीर मुनगंटीवार | श्री बी. व्ही. रेड्डी |
| श्री बी. व्ही. रेड्डी | श्री एम. म्हैसकर |
| श्रीमती जयश्री भोज | श्रीमती जयश्री भोज |
| डॉ. वाय.एल.पी. राव | श्री ए. सलील |
| श्री बी.एन. पिंगळे | श्री जी. साईप्रकाश |
| | श्री जी. नरवणे |

(I) **इतर (Entities) अस्तित्व**

**अ) एफडीसीएम लि एम्प्लाइज जी. जी. सि. ए. स्किम**

**ब) एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट**

**(ब) वरील संबंधित पक्षकारांसोबत केलेल्या व्यवहाराचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.**

**सहाय्यक कंपनीत केलेली गुंतवणूक**

| अ.क्र. | तपशील | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १ | एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड | रुपये १.०० | रुपये १.०० |

**व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईकांसोबत केलेले व्यवहार :**

व्यवस्थापकीय संचालक हे कंपनीचे व्यवस्थापकीय प्रमुख म्हणून संबंधित पक्षकार आहेत. व्यवस्थापकीय संचालक/संचालक यांना वेतन व भत्ते तसेच बैठक शुल्काच्या शोधना व्यतिरीक्त संबंधित पक्षकार संबंधाने या वर्षात कोणतेही व्यवहार नाहीत.

**व्यवस्थापकीय प्रमुख यांना शोधन केलेले वेतन व भत्ते**

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | व्यवस्थापकीय प्रमुख | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १. | श्री एन. वासुदेवन<br><br>(कालावधी) | १२.२८<br><br>(०१.०४.२०२२ ते ३१.०७.२०२२) | ३४.२५<br><br>(०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२) |
| २. | श्री के.पी. सिंह<br><br>(कालावधी) | ५.८९<br><br>(११.०८.२०२२ ते ३०.०९.२०२२) | -- |
| ३ | श्री विकास गुप्ता<br><br>(कालावधी) | १९.७१<br><br>(०१.१०.२०२२ ते ३१.०३.२०२३) | -- |

**व्यवस्थापकीय प्रमुख यांना शोधन केलेले बैठक शुल्क :**

(रक्कम रुपयात)

| **नामनिर्देशित संचालक** | **वर्ष २०२२-२०२३** | **वर्ष २०२१-२०२२** |
|---|---|---|
| श्री बी. वेणूगोपाल रेड्डी | रु. १५००/- | रु. १०००/- |
| श्री बी.एन. पिंगळे | रु. १५००/- | -- |
| श्रीमती जयश्री भोज | -- | रु. ५००/- |
| डॉ. वाय.एल.पी. राव | रु. १५००/- | -- |
| श्री जी. साईप्रकाश | -- | रु. १०००/- |
| श्री गजेंन्द्र पी. नरवणे | -- | रु. १५००/- |

**सामाईक नियंत्रणा अंतर्गत (Entity) अस्तित्व सोबत व्यवहार**

**इतर संस्थाना (Entities) अंशदान**

(रुपये लाखात)

| **अ.क्र** | **तपशील** | **वर्ष २०२२-२३** | **वर्ष २०२१-२२** |
|---|---|---|---|
| १ | एफ.डी. सी. एम. लि. एम्प्लॉइज जी.जी. सी. ए. स्किम | रु. २९५.१० | रु. ६४३.३१ |

**सहाय्यक कंपनीसोबत केलेले व्यवहार आणि आधिक्य**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड | २०२२-२३ | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| | **वर्षभरातील व्यवहार** | | |
| १ | व्हीजीएफ निधी | १०८७.२६ | ५५३.०४ |
| २ | कर्मचारी भविष्य निधी शोधन | ७.६९ | -- |
| ३ | बायोपार्क शुल्क संकलन | -- | ०.०७ |
| ४ | जंगल सफारी शुल्क संकलन | -- | ०.०८ |
| ५ | प्राप्त भाडे | -- | १४.६२ |
| ६ | परत करावयाची जास्तीची रक्कम | -- | ०.५४ |
| ७ | अग्रिम कर आणि आयकर शोधन | १२४.१८ | ७.८० |
| ८ | सुरक्षा ठेवीचे शोधन | -- | ३२.२८ |
| | **वर्षअखेर आधिक्य** | | |
| | देय | २४०.३० | १५.३० |
| | येणे | -- | -- |
| | भाग भांडवल | १०.०० | ५.१० |

**टिपणी - ३० प्रती भाग मिळकत**

समता भाग धारकांचा संबंध असलेल्या कालावधीकरीता निव्वळ नफ्यास या कालावधीत शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यांत आली आहे. तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रती भाग मिळकत | २०२२-२३ | २०२१-२२ |
|---|---|---|
| समता भागधारकांशी संबंधित नफा/तोटा | रु. ११६२५.१२ लाख | रु. ५४३३.०७ लाख |
| भारित सरासरी समता भागाची संख्या | ३,२३,१२,३४८ | ३,२३,१२,३४८ |
| रु. १००/- चे प्रती भाग मूळ/मिश्रीत मिळकत (रक्कम रुपयात) | रु. ३५.९८ | रु. १६.८१ |

**टिपणी - ३१ लांबणीवर टाकलेली कर संपत्ती (निव्वळ)**

**(रु. लाखात)**

| तपशील | चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१.०३.२०२३ अखेरचे आकडे | मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१.०३.२०२२ अखेरचे आकडे |
|---|---|---|
| **लांबणीवर टाकलेली कर संपत्ती** | | |
| संदिग्ध ऋणाकरिता तरतूद | ९७.३५ | ७१.६६ |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंशदान तरतूद | -- | ०.४२ |
| एकूण | **९७.३५** | **७२.०८** |

| | | |
|---|---|---|
| **लांबणीवर टाकलेली कर देयता** | | |
| संपत्ती यंत्रे व उपकरणावरील घसारा | ०.९२ | २.५८ |
| लांबणीवर टाकलेली कर संपत्ती/देयता (निव्वळ) | **९६.४३** | **६९.५०** |
| चालू वर्षी लांबणीवर टाकलेला कर | **(२६.९३)** | **(२०.४३)** |

## टिपणी - ३२ बँकेतील शिल्लक / बँक हमी

चालू वर्षात बँक हमी घेण्यासाठी बँकाकडे अल्पमुदती ठेवी ठेवण्यात आलेल्या नाहीत (मागील वर्षी रु. निरंक)

## टिपणी - ३३ संपत्तीची हानी

संपत्तीचे बिघाड/नुकसान याबाबत सुचना आहे किंवा कसे यासंबंधाने ताळेबंदाचे दिवशी कंपनीने संपत्तीचे निर्धारण केले आहे. ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीला बिघाड/हानी झाल्याबाबत कोणतीही सुचना नाही.

## टिपणी - ३४ कालावधीनिहाय व्यापारी येणे

(रुपये लाखात)

| तपशील | ६ महिन्यापेक्षा कमी | ६ महिने - १ वर्ष | १ ते २ वर्ष | २ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **३१ मार्च २०२३ रोजी कालावधी** | | | | | | |
| (i) अविवादीत व्यापारी येणे- प्रति प्राप्य | २९१३.६३ | १०६६.१६ | ३७७.९८ | ३६१.१६ | २१.१७ | **४७४०.१०** |
| (ii) अविवादीत व्यापारी येणे- संदिग्ध | | | | | १४६९.७७ | **१४६९.७७** |
| (iii) विवादीत व्यापारी येणे-प्रति प्राप्य | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (iv) विवादीत व्यापारी येणे-संदिग्ध | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **३१ मार्च २०२२ रोजी कालावधी** | | | | | | |
| (i) अविवादीत व्यापारी येणे- प्रति प्राप्य | ४९६१.०१ | ५९८.१२ | ३६१.९७ | ५०९.६२ | ३४.८९ | **६४६५.६१** |
| (ii) अविवादीत व्यापारी येणे- संदिग्ध | | | | | १००६.२५ | **१००६.२५** |
| (iii) विवादीत व्यापारी येणे-प्रति प्राप्य | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (iv) विवादीत व्यापारी येणे-संदिग्ध | -- | -- | -- | -- | -- | -- |

**टिप्पणी - ३५ कालावधीनिहाय व्यापारी देणे**

(रुपये लाखात)

| तपशिल | १ वर्षापेक्षा कमी | १ - २ वर्ष | २ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **३१ मार्च २०२३ रोजी कालावधी** | | | | | |
| (i) सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग | -- | -- | -- | -- | **--** |
| (ii) ईतर | २४.४८ | -- | -- | ८.७७ | **३३.२५** |
| (iii) विवादीत देणी (सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग) | -- | -- | -- | -- | **--** |
| (iv) विवादीत देणी ईतर | -- | -- | -- | -- | **--** |
| **३१ मार्च २०२२ रोजी कालावधी** | | | | | |
| (i) सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग | -- | -- | -- | -- | **--** |
| (ii) ईतर | २०.३३ | ०.१३ | ०.१२ | ८.७७ | **२९.३५** |
| (iii) विवादीत देणी (सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग) | -- | -- | -- | -- | **--** |
| (iv) विवादीत देणी ईतर | -- | -- | -- | -- | **--** |

**टिपणी - ३६ भांडवली वचनबध्दता**

(अ) भांडवली कामासाठी कोणतेही विशिष्ट कंत्राट देण्यांत आलेले नसल्यामुळे ताळेबंदाचे दिवशी भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम रु. निरंक (मागील वर्ष रु. निरंक) प्रगतीपथावर असलेल्या भांडवली कामावरील खर्च हा सर्वेक्षण यासारख्या प्राथमिक कामाशी संबंधित आहे.

**टिपणी - ३७ संभाव्य देयता**

तरतूद न केलेली संभाव्य देयता आणि कंपनी विरुध्द केलेल्या दाव्याचे संबंधात न स्विकारलेल्या देयता :

ए) i) कंपनीच्या मालकीची/कंपनीचे ताब्यात असलेली काही जमीन, ईमारती इत्यादी वरील नगरपालिका आणि इतर स्थानिक करासंबंधी, निर्धारण प्रलंबित असल्यामुळे तसेच काही प्रकरणात देयता स्विकृत न केल्यामुळे : रक्कम स्पष्ट करण्यासारखी नाही.

ii) सन २०१८-१९ ते २०२२-२३ या वर्षाकरिता आगार विभाग बल्लारशाचे बाबतीत नगर परिषद कर देयते वरील रु. ३५.२७ लाख (मागील वर्ष रु. १४.३७ लाख)

व्याजाची देयता समुचित प्राधिका-यांकडे अपील प्रलंबित असल्यामुळे कंपनीने स्विकृत केलेली नाही.

iii) जमीन महसूल जर काही असल्यास.

बी) ताळेबंदाचे दिवशी भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम : निरंक

सी) i) पात्र मजूरांसाठी या अगोदरच्या वर्षाची भविष्य निर्वाह निधीचे संबंधात जर काही देयता असल्यास.

ii) विविध वनप्रकल्प विभागाअंतर्गत कंपनीद्वारे मजूरांच्या भविष्य निर्वाह निधीचे शोधनात अनियमितता/शोधन न करणे या संबंधाने भविष्य निर्वाह निधी आयुक्त, नागपूर यांनी आकारलेल्या नुकसान भरपाई बाबत अंदाजित देयता रु. ३६१४.८५ लाख (मागील वर्षी रु. २०८६.९८ लाख) सदरहू प्रकरणी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अपील न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार पुढील निर्णयाचे अधीन राहून कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच भविष्य निर्वाह आयुक्त अकोला यांनी यवतमाळ वन प्रकल्प विभागात भविष्य निर्वाह निधी अंशदानासंबंधाने अपीलावर/याचिकेवर निर्णय प्रलंबित असल्याने आकारलेल्या नुकसान भरपाईबाबत देयता रु. २०२.७४ लाख (मागील वर्षी रु. २०२.७४ लाख)

iii) मजूरांचे संबंधाने उपदानाबाबत जर काही देयता असल्यास.

iv) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेशान्वये किनवट वन प्रकल्प विभागातील मजूरांना कामावरुन कमी करण्यांचे प्रकरणाचे बाबतीत देयता रु. २६.३४ लाख (मागील वर्षी रु. २६.३४ लाख) आणि श्री के. डी. चव्हाण वनमजूर यांच्यावर झालेल्या वन्य प्राण्याच्या हल्ल्यात जखमी झाल्यामुळे नुकसान भरपाई संबंधाने कामगार न्यायालय नांदेड यांनी प्रकरण क्रमांक डब्लूसीए/११/२००० मध्ये नुकसान भरपाई संबंधाने पारित केलेल्या आदेशावर कंपनीने दाखल केलेले अपील प्रलंबित असल्याने देयता रु. ०.८३ लाख (मागील वर्षी रु. ०.८३ लाख)

डी) विक्रीकर/मूल्यवर्धीत कर, वस्तू व सेवा कर/आयकर निर्धारण प्रलंबित असल्यामुळे/लांबणीवर टाकल्यामुळे दंड, व्याज इ. बाबत जर काही देयता असल्यास.

ई) कर्मचारी आणि मजूर यांच्या विविध मागण्या अभिनिर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे, त्याबाबत देयता निश्चित करता येण्यासारखी नाही.

एफ) रोपवन क्षेत्रातील उभ्या झाडांची प्रत्यक्ष पडताळणी न झाल्यामुळे काही संभाव्य नुकसान इत्यादी असल्यास.

जी) भूपटयाचे भाटका (Patta rent) संबंधाने काही देयता इ. असल्यास.

एच) मा. कामगार न्यायालय तृतीय नागपूर यांनी प्रकरण क्र. पीजीए/३/२०१३ मध्ये दि. २८.९.२०१५ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार श्री के. जी. सहारे मजूर नागपूर वन प्रकल्प विभाग यांना सेवा उपदानाचे संबंधाने, कंपनीने दाखल केलेले अपील प्रलंबित असल्याने देयता रु. ०.९७ लाख (मागील वर्षी रु. ०.९७ लाख).

आय) वर नमूद केलेल्या प्रकरणा व्यतिरिक्त कंपनीविरुध्द सुरु केलेल्या इतर न्यायालयीन प्रकरणात संभाव्य देयता निश्चित करता येत नाही.

जे) आयकर अपीलचे प्रकरणातील देयता रु. १९४.२९ लाख (मागील वर्षी रु. ८८.६४ लाख).

## टिपणी - ३८ अतिरीक्त विनियामक विषयक माहिती

### अ) धारण केलेल्या बेनामी संपत्तीचा तपशिल :

बेनामी व्यवहार (प्रतिबंध) अधिनियम १९८८ व त्याअंतर्गत नियमानुसार कंपनीने कोणतेही बेनामी संपत्ती धारण केली नसल्याने कंपनीविरुध्द कार्यवाही प्रारंभ झाली नाही किंवा प्रलंबित नाही. त्यामुळे हयाबाबत प्रकटन आवश्यक नाही.

### ब) बुध्दीपुरस्सर कसूरदार :

ताळेबंदीच्या दिवशी किंवा वित्तीय विवरणपत्रास मंजूरीचे दिवशी कंपनीला बुध्दीपुरस्सर कसूरदार घोषित केलेले नाही, त्यामुळे हयाबाबत प्रकटन आवश्यक नाही.

### क) कंपनी निबंधकाकडे (ROC) भार किंवा समाधानाची नोंदणी

सांविधिक कालावधी नंतर ज्याची नोंदणी कंपनी निबंधका (रजिस्ट्रार ऑफ कंपनीज) कडे करावयाची आहे, असा कोणताही भार कंपन्याविरुध्द नाही. त्यामुळे यासंबंधाने प्रकटन आवश्यक नाही.

### ड) कंपनीच्या स्तरांच्या संख्येचे अनुपालन

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम २ अनुच्छेद (८७) अंतर्गत कंपन्यांचे (स्तराच्या संख्येवर निर्बंध) नियम २०१७ सह वाचावे. त्यानुसार विहीत स्तराच्या संख्येचे अनुपालन करावयाचे आहे. अशा डाउनस्ट्रीम (downstream) कंपन्यामध्ये कंपनीची गुंतवणूक नाही. त्यामुळे यासबंधाने कोणतेही प्रकटन आवश्यक नाही.

### ई ) ऋणाचा वापर

कंपनीने ऋण स्वरुपात निधी घेतला नाही. त्यामुळे ऋणाच्या वापरासबंधाने आवश्यक प्रकटन कंपनीस लागू नाही.

### फ) क्रिस्टो चलन किंवा आभासी चलनाचा तपशिल

कंपनीने वित्तीय वर्षात क्रिस्टो चलन किंवा आभासी चलनात व्यापार किंवा गुंतवणूक केलेली नाही. त्यामुळे यासाठी आवश्यक प्रकटन कंपनीला लागू नाही.

**टिपणी - ३९ संकीर्ण**

अ) व्यापारी येणे अंतर्गत विविध लेख्यातील वैयक्तिक शिल्लक, येणे रकमा आणि इतर येणे विकलनाधिक्य यांस पुष्टी मिळालेली नाही.

ब) ऋणा अंतर्गत कर्मचा-यांकडून नामंजूर प्रमाणकापोटी वसुलीयोग्य रक्कम रु. ५४.४४ लाख (मागील वर्षी रु. ५४.२३ लाख) चा समावेश आहे.

क) कंपनीच्या आधीच ताब्यात असलेल्या जमिनीच्या संबंधाने जमीन महसूल इ. तर काही असल्यास त्याकरीता कोणतीही तरतूद केलेली नाही.

ड) जनहित याचिका क्रमांक ३४२१५ तत्कालीन खामगाव वन प्रकल्प विभागातील रोजगार हमी योजना संबंधाने प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने जर काही देयता असल्यास.

ई) वितरकांना खर्चासाठी दिलेले अग्रिम वितरकाचे पदनामाने बँकेत खाते उघडून हाताळण्यात येत असून ऋण व अग्रिमा अंतर्गत वर्गीकृत करण्यात आले आहे.

एफ) सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकीपोटी लेख्यात दिनांक ३१.०३.२०२२ अखेर रु. ४५००.०० लाख (मागील वर्षी रु. ४५००.०० लाख) (अंदाजे) तदर्थ आधारावर तरतूद करण्यात आलेली आहे.

जी) चालू वर्षी कर्मचा-यांसाठी प्रोत्साहनात्मक रकमेपोटी अंदाजे रु. ७००.०० लाख (मागील वर्षी रु. ८००.०० लाख) तदर्थ तरतूद करण्यात आलेली आहे.

एच) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता दिनांक ०१-११-२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये रू. ७०.०० लक्ष लाभांष मंजूर करण्यात आला, त्याचे शोधन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

आय) त्यानंतर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता रू. ३२७.५० लक्ष आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता रू. २७५.०० लक्ष लाभांष अनुक्रमे दिनांक ३०-०५-२०२३ आणि २७-०९-२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आला व त्याचे शोधन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

**टिपणी - ४० पुनर्गट आणि फेर मांडणी**

ताळेबंद, समावेश उत्पन्नासह नफातोटापत्रक आणि रोख प्रवाह विवरणपत्र व भाग भांडवलातील बदलाचे विवरणत्र व त्यांचेशी संबंधित असलेल्या टिपणीमधील मागील वर्षाचे आकडे आवश्यक त्या ठिकाणी पुन:र्गट आणि फेर मांडणी करुन घेतलेले आहेत. वित्तीय विवरण पत्रातील आकडे जवळच्या लाखात व हजारात दर्शविण्यांत आलेले आहेत.

वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग असलेल्या टिपणी क्रमांक १ ते ४० करिता स्वाक्षरी.

आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार

आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार
शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८
**UDIN : 23135038BGZDQY6729**

सी.एन. पटेल आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए मिलींद पटेल)
भागीदार
स.क्र.१०९९७४
**UDIN : 23109974BGUIHN1189**

स्थळ : नागपूर
दिनांक : २८.१२.२०२३

संचालक मंडळाचे वतीने व करिता

स्वाक्षरित
(सुधीर मुनगंटीवार)
अध्यक्ष
सं.ओ.क्र # ०७२०८३७३

स्वाक्षरित
(विकास गुप्ता)
व्यवस्थापकीय संचालक
सं.ओ.क्र # ०९७५३९०५

स्वाक्षरित
(सीए **कौस्तुभ विनय भांबुरकर**)
**लेखा नियंत्रक व वित्तीय सल्लागार**

स्वाक्षरित
(सीएस सौरभ सिंह)
कंपनी सचिव
ए-२२०५३

स्थळ : **चंद्रपूर**
दिनांक : २८.१२.२०२३

# महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN : U45200MH1974SGC017206

# एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे २०२२-२३

**पंजियीत कार्यालय : "एफडीसीएम भवन", प्लॉट नं. ३५९/ब, अंबाझरी, हिंगणा रोड, नागपूर-४४० ०३६**

# कार्यालय
# महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर

# OFFICE OF THE
# ACCOUNTANT GENERAL (AUDIT)-II, MAHARASHTRA, NAGPUR

डी.पी. सेल (ए एम जी-II)/एफडीसीएम/२२-२३/०६
दिनांक १५-०४-२०२४

**गोपनीय**

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
एफडीसीएम भवन, प्लॉट क्र. ३५९/ब, अंबाझरी, हिंगणा रोड,
नागपूर ४४० ०३६.

विषय: फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रिकृत लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अभिप्राय.

महोदय / महोदया,

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रिकृत लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे 'निरंक अभिप्राय' प्रमाणपत्र ('Nil Comment' Certificate) सोबत जोडले आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभा (A.G.M.) झाल्यानंतर वार्षिक अहवालाच्या तीन छापील प्रती या कार्यालयास कृपया पाठविण्यात याव्यात, तसेच उपरोक्त वार्षिक अहवाल विधान सभेत सादर करण्याची तारीख या कार्यालयास कळवावी.

आपला विश्वासू,

सहपत्र: वरील प्रमाणे

स्वाक्षरीत
(नरेश कुमार मन्ने)
उप महालेखाकार/AMG-II

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) अंतर्गत फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूरच्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावरील अभिप्राय**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर च्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता वित्तीय विवरणपत्रे, कंपनी अधिनियम २०१३ नुसार विहीत केलेल्या अहवालाचे चौकटीत तयार करण्याची जबाबदारी ही कंपनीच्या व्यवस्थापनाची आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३९ (५) नुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखापरीक्षक हे अधिनियमाच्या कलम १४३ अंतर्गत त्यांनी स्वतंत्रपणे केलेल्या लेखापरीक्षणाचे आधारे व अधिनियमाच्या कलम १४३ (१०) अंतर्गत विहित लेखापरीक्षण प्रमाणानुसार या वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी जबाबदार आहेत. त्यांनी ही जबाबदारी पार पाडल्याचे त्यांचे दिनांक २८.१२.२०२३ रोजीच्या लेखापरीक्षकांच्या अहवालात नमूद केले आहे.

मी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे वतीने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (अ) त्यानुसार फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूरच्या दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे पूरक लेखा परीक्षण केलेले आहे. हे पूरक लेखापरीक्षण आम्ही सांविधिक लेखा परीक्षकांचे कामाची कागदपत्रे न पाहता आणि मूलतः सांविधिक लेखापरीक्षकांनी केलेल्या प्राथमिक तपासाला मर्यादित राहून स्वतंत्रपणे आणि कंपनीच्या अभिमत व्यक्ती व लेखांकनासंबंधी निवडक अभिलेख तपासून केले आहे.

माझ्या पूरक लेखा परीक्षणाच्या आधारावर अधिनियमाच्या १४३ (६) (ब) अंतर्गत सांविधीक लेखापरिक्षणाचे अहवालावर पूरक किंवा कोणतेही अभिप्राया देण्यायोग्य कोणतेही ठळक बाब माझे निदर्शनास आलेले नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांचे वतीने व करिता

स्वाक्षरीत
(लता मल्लिकार्जुना)
प्रधान महालेखाकार

स्थळ : नागपूर
दिनांक: /०४/२०२४

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल,**
**२०५ घटाटे चेंबर्स,**
**पंचशील चौक**
**नागपूर - ४४० ०१२.**

**सी एन पटेल आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल,**
**प्लॉट नं.१२, आराधना,**
**एसबीआय एम्प्लॉइज**
**सोसायटी, काटोल रोड,**
**नागपूर - ४४० ०१३.**

## "स्वतंत्र लेखा परीक्षकांचा अहवाल"

प्रति,
सभासद,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड,
मुख्य कार्यालय,
नागपूर.

## एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे लेखा परीक्षणावर अहवाल

### १. अभिप्राय

आम्ही फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (यानंतर सूत्रधारी कंपनी म्हणून निर्दिष्ट) चे सोबतचे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे ज्यात दिनांक ३१ मार्च २०२३ रोजीचा एकत्रिकृत ताळेबंद, एकत्रिकृत नफातोट्याचा हिशेब (इतर समावेशक उत्पन्न अंतर्भूत करुन) व एकत्रिकृत रोख प्रवाह, वर्ष अखेर भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र तसेच महत्वाच्या लेखा विषयक धोरणाचे सारांशासह एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राशी संबंधित टिपणी तसेच त्यासोबत जोडलेल्या इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचे लेखापरीक्षण केले आहे.

आमच्या अहवालाच्या मत अस्वीकरणासाठी आधार विभागात वर्णन केलेल्या बाबींचे महत्व लक्षात घेऊन कंपनीच्या सोबतच्या एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावर आम्ही मत व्यक्त करीत नाही. ह्या एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावर लेखा परीक्षण मताचा आधार तयार करण्यासाठी पुरेसे योग्य लेखापरीक्षण पुरावे प्राप्त करणे आम्हास शक्य झाले नाही.

### २. मताचा अस्विकारणासाठी आधार

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत विनिर्दिष्ट लेखापरीक्षणावरील मानकानुसार (SAs) आम्ही एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे आमचे लेखापरीक्षण केले आहे. ह्या मानकांतर्गत आमच्या जबाबदा-या पुढे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षणाकरिता जबाबदा-या अंतर्गत वर्णन केल्या असून त्या आमच्या अहवालाचा भाग आहेत. भारतीय सनदी लेखापाल संस्थेव्दारे निर्गमित नीतीतत्व संहितेनुसार तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतूदी आणि त्यामधील नियमा अंतर्गत एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणाशी सुसंबध्द असलेल्या नैतिक आवश्यकता सह आणि सदर आवश्यकता तसेच नितितत्व संहितेनुसार आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदा-या पार पाडल्या असून त्यानुसार आम्ही कंपनीपासून स्वतंत्र आहोत. आम्ही प्राप्त केलेला लेखापरीक्षण विषयक पुरावा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावर आमचे अभिप्राय व्यक्त करण्यासाठी पुरेसा व समर्पक आधार आहे असा आम्हाला विश्वास आहे.

सूत्रधारी कंपनीच्या एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड,नागपूर या सहाय्यक कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकांनी (पूर्वी एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड या नावाने ओळखली जाणारी) (यापुढे "सहाय्यक कंपनी" म्हणून संदर्भित) त्यांचे अहवालात दिनांक ३१ मार्च २०२३ करीता संपणा-या वर्षाकरीता मताचा अस्विकारणाबाबतचा आधार "विवरणपत्र अ" मध्ये नमूद केला आहे.

या बाबींचा परीणाम म्हणून, दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपणा-या वर्षाकरीता एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे हे अधिनियमाच्या कलम १३३ अंतर्गत सुधारित केल्याप्रमाणे कंपनी (भारतीय लेखांकन मानक) नियम २०१५ सह वाचल्यास त्याअन्वये विहित केलेल्या भारतीय लेखांकन मानकाशी (Ind AS) अनुरुप आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार दि. ३१ मार्च २०२३ अखेर समुहाची स्थिती, एकत्रिकृत नफा व एकूण स्वतंत्र समावेशक उत्पन्न, स्वतंत्र भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र आणि त्या दिवशी संपणा-या वर्षाकरिता स्वतंत्र रोख प्रवाह विवरणपत्र यांची खरी व वास्तववादी स्थिती दर्शवित आहेत हे ठरविण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**(अ) लेखापरीक्षण विषयक महत्वाच्या बाबी**

असूचीबध्द कंपनी असल्यामुळे लेखापरीक्षण मानक (एसए) ७०१ नुसार लेखापरीक्षण विषयक महत्वाच्या बाबीवर प्रतिवेदन करणे कंपनीला लागू नाही.

**(ब) महत्वपूर्ण बाब (Emphasis of Matter)**

१. कंपनीने आपल्या कर्मचा-यांसाठी रजा रोखीकरण लाभासंबंधाने निवृत्ती लाभांचे विमागणितीय मूल्यांकन प्राप्त केलेले नाही. (एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. २५ (ब) पहावी)
२. कंपनीने देय असलेल्या रकमेबाबत राज्य शासन तसेच इतर शासकीय विभागाकडून पुष्टी उपलब्ध करुन दिलेली नाही. अशा विभागाकडून पुष्टी अभावी देय रकमेच्या वहनक्षमतेच्या अचूकपणाबाबत खात्री करता येवू शकली नाही. (एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. ३९ (अ) पहावी)
३. कंपनीने सूक्ष्म,लघु मध्यम उपक्रमांच्या पुरवठाधारकांसोबत पत्रव्यवहाराची स्थिती आमच्या तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली नाही. त्यांचे पुष्टीअभावी सूक्ष्म,लघु मध्यम उपक्रमांचे पुरवठाधारकांना देणे आणि देय रकमांबाबत अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.
४. आवश्यक असल्यानुसार कंपनी न्यायालयीन प्रकरणा संबंधाने आकस्मिक स्वरुपाच्या देयता निश्चित करण्यास परिमाण दिलेले नाही. (एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राची टिपणी क्र. ३७ (१) पहावी.

**(क) वित्तीय विवरणपत्रे आणि त्यावरील लेखा परीक्षकांच्या अहवाला व्यतिरिक्त इतर माहिती**

समुहाचे संचालक मंडळ इतर माहिती तयार करण्यासाठी जबाबदार आहे. इतर माहितीमध्ये संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट केलेल्या माहितीसह संचालक मंडळाच्या अहवालास सहपत्रे, व्यवसाय जबाबदारी अहवाल यांचा समावेश आहे परंतु त्यामध्ये वित्तीय विवरणपत्रे आणि त्यावरील आमचा लेखा परीक्षण अहवाल समाविष्ट नाही.

वित्तीय विवरणपत्रावरील आमचे मत इतर माहितीचा समावेश करत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही आश्वासन प्रकाराचे निष्कर्ष व्यक्त करत नाही.

वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखापरीक्षणा संबंधाने आमची जबाबदारी ही इतर माहितीचे वाचन करण्याची आहे आणि असे करतांना इतर माहिती एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राशी बरीच विसंगत आहे किंवा आमच्या लेखा परीक्षणा दरम्यान मिळविलेली आमची माहिती किंवा अन्यथा विशेषकरुन चुकीची असल्याचे दिसून येत आहे यावर विचार करावयाचा आहे. आम्ही केलेल्या कामाच्या आधारावर या इतर माहितीमध्ये महत्वपूर्ण असत्यकथन असल्याबाबत आम्ही निष्कर्ष काढल्यास त्याबाबत वस्तुस्थिती प्रतिवेदित करणे आम्हाला आवश्यक आहे. यासंबंधाने आम्हाला कांहीही प्रतिवेदन करावयाचे नाही.

## (ड) एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राकरिता व्यवस्थापनाची जबाबदारी

भारतीय लेखांकन मानक (Ind AS) आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वानुसार एकत्रिकृत वित्तीय स्थिती, एकत्रिकृत वित्तीय कार्य, एकत्रिकृत एकूण समावेशक उत्पन्न, एकत्रिकृत भाग भांडवलातील बदलाचे विवरणपत्र आणि कंपनीचे एकत्रिकृत रोख प्रवाह विवरणपत्र याबाबत कंपनी अधिनियम २०१३ (“अधिनियम”) च्या कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या बाबी संबंधाने खरी व वास्तववादी स्थिती दर्शविणारे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी समुहाचे संचालक मंडळ जबाबदार आहे. या जबाबदारीमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार समुहाच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे लेखांकन दस्तऐवज ठेवणे तसेच फसवणूक आणि इतर अनियमितताचा तपास करणे व प्रतिबंध करण्यासाठी योग्य लेखा विषयक धोरणाची निवड करुन लागू करणे, वाजवी आणि दूरदर्शी प्राक्कलन करणे आणि निर्णय घेणे, फसवणूक आणि चुका यामुळे महत्वपूर्ण असत्यकथनापासून मुक्त आणि खरी व वास्तववादी स्थिती दर्शविणारे वित्तीय विवरणपत्रे तयार करणे व सादर करण्यासंबंधाने लेखाकंन दस्तऐवजाची अचूकता व पूर्तता याची खात्री करण्यासाठी पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची आखणी, अंमलबजावणी व पालन करणे इत्यादिचा सुध्दा अंतर्भाव होतो.

जोपर्यंत व्यवस्थापन एकतर समूहाचे परिसमापन करीत नाही किंवा कार्य करणे थांबवित नाही किंवा तसे केल्याशिवाय वास्तववादी विकल्प उपलब्ध राहत नाही तोपर्यंत कार्य चालू ठेवण्यासाठी (Going Concern) कंपनीच्या कार्यकुशलतेचे निर्धारण करणे, कार्य चालू ठेवण्यासाठी संबंधित बाबीचे प्रकटन करणे आणि लेखांकन कार्य चालू ठेवण्याबाबत (Going concern) आधाराचा उपयोग करणे यासाठी एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना समूहात समाविष्ट कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे.

ते संचालक मंडळ कंपनीच्या आर्थिक अहवाल प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी देखील जबाबदार असतात.

## (ई) लेखापरीक्षकांची जबाबदारी

संपूर्ण एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे फसवणूक किंवा चुका यामुळे महत्वपूर्ण असत्यकथनापासून मुक्त आहेत यासंबंधाने वाजवी आश्वासन प्राप्त करणे आणि आमचे अभिप्राय अंतर्भूत असलेला लेखापरीक्षकांचा अहवाल निर्गमित करणे हे आमचे उद्देश आहेत. वाजवी आश्वासन हे आश्वासनाची वरिष्ट पातळी आहे. परंतु प्रमाण लेखांकन मानकानुसार केलेले लेखापरीक्षण अस्तित्वात असलेल्या महत्वपूर्ण असत्कथनाचा नेहमी तपास करेल याची

हमी नसते. असत्यकथन हे फसवणूक किंवा चुका पासून उद्‌भवू शकते आणि जर अशा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे आधारावर उपयोगकर्त्याचे आर्थिक निर्णय वैयक्तिकरित्या, एकूणात, संयुक्तपणे प्रभावित होणे अपेक्षित असल्यास सदर असत्यकथन हे महत्वपूर्ण मानण्यात येते.

प्रमाण लेखांकन मानकानुसार लेखापरीक्षणाचा भाग म्हणून आम्ही व्यावसायिक विवेकबुध्दीचा वापर करुन लेखा परीक्षणात संपूर्णपणे व्यावसायिक संशयी वृत्तीचे पालन केले आहे. आम्हाला देखील :-

- चुका किंवा फसवणूक यामुळे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राच्या महत्वपूर्ण असत्यकथनाच्या जबाबदा-यांची ओळख व अंदाज आहे. अशा जबाबदा-यास प्रतियोगी स्वरुपाच्या लेखापरीक्षा कार्यपध्दतीची आखणी करुन त्याप्रमाणे लेखापरीक्षणाचे कार्य केले जाते. आणि आमच्या अभिप्रायाबाबत आधार तयार करण्यासाठी योग्य व पुरेसे लेखापरीक्षण पुरावे प्राप्त केले जातात. फसवणुकीमध्ये संगनमत, बनावट दस्तऐवज तयार करणे उद्देशपूर्वक अकृती, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रण अधिभावी ठरणे यासारख्या बाबी अंतर्भूत होत असल्याने चुकामंळे उद्‌भवणा-या जबाबदारीपेक्षा फसवणूकीपासून महत्वपूर्ण असत्यकथनाचा तपास न होण्याची जबाबदारी जास्त असते.

- परिस्थितीशी अनुरुप अशा योग्य लेखापरीक्षा कार्यपध्दतीची आखणी करण्यासाठी लेखापरीक्षणाशी संबंधित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची समज करुन घेण्यात येते. कंपनीकडे पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती अस्तित्वात आहे काय, अशा नियंत्रण पध्दतीची परिणामकारकता यासंबंधाने कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (३) (i) अंतर्गत आमचे मत व्यक्त करण्यासाठी आम्ही जबाबदार आहोत.

- व्यवस्थापनाने उपयोगात आणलेल्या लेखाविषयक धोरणांची समुचितता, लेखांकन प्राक्कलने आणि केलेले संबंधित प्रकटन याचे मूल्यमापन केले जाते.

- कंपनीच्या कार्य चालू ठेवण्याचे कार्यक्षमतेबाबत शंका उपस्थित करणा-या घटना किंवा परिस्थितीचे संबंधाने विशेष स्वरुपाची अनिश्चितता अस्तित्वात असल्यास लेखापरीक्षण पुराव्याचे आधारावर व्यवस्थापनाने उपयोगात आणलेल्या लेखांकनाचे कार्य चालू ठेवण्याचे आधाराबाबतच्या समुचिततेवर निष्कर्ष काढण्यात येतो. विशेष स्वरुपाची अनिश्चितता अस्तित्वात असल्याबाबत आम्ही निष्कर्ष काढल्यास आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालात वित्तीय विवरणपत्रातील संबंधित प्रकटनाकडे लक्ष वेधणे आम्हाला आवश्यक असते किंवा जर असे प्रकटन अपर्याप्त असेल तर आमचे अभिप्रायात दुरुस्ती करावी लागते. आम्ही काढलेले निष्कर्ष आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालाचे दिनांकापर्यंत लेखापरीक्षणातील प्राप्त पुराव्यावर आधारित आहेत. तथापि भविष्यातील घटना किंवा परिस्थिती समूहाचे चालू असलेले कार्य (Going concern) बंद करण्यास कारणीभूत ठरु शकते.

एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे प्रकटनासह एकूण सादरीकरण, संरचना आणि आशय यांचे मूल्यमापन केले जाते. तसेच एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे महत्वाचे व्यवहार आणि घटनांचे प्रतिनिधीत्व अशा पध्दतीने करतात की, ज्यामुळे वाजवी सादरीकरण साध्य होते.

भौतिकता हा वित्तीय विवरणपत्रातील असत्यकथनाचा परिणाम आहे, ज्यामुळे वित्तीय विवरणपत्राची संमजसपणे चांगली माहिती असलेल्या उपयोगकर्त्याचे आर्थिक निर्णय प्रभावित होऊ शकतात. आम्ही परिणामात्मक भौतिकता विचारात घेतो आणि उपरोक्त संयुक्तपणे नियंत्रित संस्थाच्या संबंधाने अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोटकलम ३ व ११ चा संबंध केवळ अशा लेखापरीक्षित विवरणपत्रावर पूर्णपणे आधारित आहे. केलेल्या कामावरील आमचा विश्वास, इतर लेखापरीक्षकांचे अहवाल आणि व्यवस्थापनाव्दारे प्रमाणित वित्तीय विवरणपत्रासंबंधी वरील बाबीसंबंधाने एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रावरील आमचा अहवाल आणि खाली दिलेल्या विधीविषयक आणि विनियामक आवश्यकता याबाबी संबंधाने आमचे अभिप्रायात बदल नाही. ह्या बाबी संबंधाने आमचे मत बदललेले नाही.

आमच्या लेखापरीक्षणात इतर बाबीबरोबरच आम्ही ओळखलेल्या अंतर्गत नियंत्रणातील महत्वपूर्ण त्रृटी असल्यास त्यासह लेखापरीक्षणाची नियोजित व्याप्ती आणि वेळ तसेच लेखापरीक्षणाचे महत्वपूर्ण निष्कर्षासंबंधाने नियमनाचा कार्यभार असलेल्या सोबत आम्ही संवाद साधतो.

**(फ) इतर बाबी**

आम्ही एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड ह्या सहाय्यक कंपनीच्या वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षण केलेले नाही, एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात विचारात घेतल्याप्रमाणे ज्यांच्या वित्तीय विवरणपत्रात दि. ३१ मार्च २०२३ रोजी एकूण संपत्ती रू. ३३२२.८९ लाख एकूण उत्पन्न रू. ९९२.३७ लाख आणि त्याच दिवशी संपलेल्या वर्षाकरीता रोख प्रवाहात निव्वळ बदल रु. ०.७८ लाख दिसून येत आहे. एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात विचारात घेतल्याप्रमाणे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरीता रु. २६२.९१ लाख निव्वळ नफ्याचा समूहाचा हिस्सा देखील अंतर्भूत असून त्यांचे लेखापरीक्षण आम्ही केलेले नाही. ह्या वित्तीय विविरणपत्राचे वित्तीय माहितीचे लेखा परीक्षण इतर लेखापरीक्षकांनी केलेले असून व्यवस्थापनाने त्यांचे अहवाल आम्हाला पुरविले आहेत. ह्या सहाय्यक कंपन्यासंबंधाने एकत्रित वित्तीय विविरणपत्रात अंतर्भूत केलेल्या रकमा आणि प्रकटनाचे बाबतीत आमचे मत आणि अधिनियमाच्या कलम १४३ उपकलम (३) चे बाबतीत उपरोक्त सहाय्यक कंपन्याचे संबंधाने आमचा अहवाल पूर्णपणे इतर लेखापरीक्षकांच्या अहवालावर आधारित आहे.

**(ग) इतर विधी विषयक आणि विनियामक आवश्यकतावर अहवाल**

१. अधिनियमाच्या कलम १४३ चे पोटकलम ११ अन्वये केंद्र शासनाव्दारे निर्गमित कंपनी (लेखा परीक्षकांचा अहवाल) आदेश २०१६ ('आदेश') नुसार आवश्यक असलेल्या सदर आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मधील विनिर्दिष्ट बाबीसंबंधाने निवेदन आम्ही सहपत्र 'ब' मध्ये देत आहोत.

२. कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३(५) अंतर्गत आवश्यकतेनुसार, लेखापरीक्षणाच्या सुचविलेल्या पध्दतीचे अनुपालन करुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे व्दारा निर्गमित निर्देशावरील निवेदन आम्ही सहपत्र 'ड ' मध्ये देत आहोत.

३.	कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ (३) मधील आवश्यकतेनुसार आम्ही प्रतिवेदन करतो की:

**अ)** आमच्या माहिती आणि समजुतीप्रमाणे लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्ही मागितले व प्राप्त केले आहेत.

**ब)** आमच्या मते आम्ही केलेल्या लेखापुस्तकाचे तपासणीवरुन समुहाने कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य ती लेखापुस्तके समुहाव्दारे ठेवण्यात आली आहेत याबाबत टिप्पणी करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**क)** या अहवालाशी संबंधित एकत्रिकृत ताळेबंद, एकत्रिकृत नफातोटा पत्रक आणि एकत्रिकृत रोख प्रवाह विवरणपत्र यांचा एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्र तयार करण्यासाठी ठेवलेल्या संबंधित लेखापुस्तकाशी मेळ आहे.

**ड)** आमच्या मते उपरोक्त एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे भारतीय लेखांकन मानक १९ चे अधिन राहून अधिनियमाच्या कलम १३३ अंतर्गत विनिर्दिष्ट लेखांकन मानकाचे (भारतीय लेखांकन मानके) कंपनी नियम २००५ सुधारित केल्याप्रमाणे वाचावे. त्यानुसार अनुपालन करीत आहेत याबाबत टिप्पणी करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**ई)** दि. ३१ मार्च २०२३ रोजी संचालक मंडळाने अभिलिखित केलेल्या संचालकाकडून मिळालेल्या लेखी निवेदनाच्या आधारावर नियुक्त केलेल्या संचालकापैकी दि. ३१ मार्च २०२३ रोजी कोणीही संचालक कंपनी अधिनियम २०१३ कलम १६४(२) अन्वये अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

**फ)** समुहाच्या आर्थिक प्रतिवेदनावरील पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने आणि अशा नियंत्रणाचे प्रभावी अंमलबजावणी संबंधाने ‘सहपत्र क’ मधील आमचा स्वतंत्र अहवाल पहावा.

**ग)** आमच्या मते दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता समुहाने आपल्या संचालकांना अधिनियमाच्या कलम १९७ मधील तरतूदीनुसार अनुसूची V सह वाचल्यास व्यवस्थापकीय परिश्रमिकाचे शोधन केले आहे / तरतूद केली आहे.

४.	लेखापरीक्षकांच्या अहवालात अंतर्भूत करावयाच्या इतर बाबीसंबंधाने कंपनी (लेखापरीक्षा व लेखापरीक्षक) नियम २०१४ च्या नियम ११ नुसार आमच्या मते आणि आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार :-

i)	कायद्याने आवश्यक असल्याप्रमाणे न्यायालयीन प्रकरणाचे बाबतीत प्रलंबित खटल्याचा लेख्यावरील प्रभाव निश्चित करण्यास समुह असमर्थ आहे. (एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचे टिपणी क्र. ३७ (i) कडे लक्ष वेधण्यात येत आहे.)

ii)	समुहाकडे विशेष अंदाजित नुकसान होण्याजोगे व्युत्पन्न करारासह कोणतेही दिर्घमुदती करार किंवा पोटकरार नाहीत.

iii)	गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीत स्थानांतरीत करावयाच्या रकमेचे स्थानांतरण करण्यास समुहाव्दारे विलंब झालेला नाही.

iv) **(अ)** व्यवस्थापनाने अभिवेदन केले आहे की, त्यांच्या माहिती आणि विश्वासानुसार लेख्याचे टिपणीत प्रकटन केल्याव्यतिरीक्त समुहाने कोणास किंवा कोणत्याही इतर व्यक्ती किंवा विदेशी संस्थासह (मध्यस्थ) इतर संस्था यांना अभिलिखित किंवा अन्यथा मध्यस्थ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही पध्दतीने ओळख असलेल्या किंवा समुहाच्या वतीने इतर व्यक्ती किंवा संस्थाना (अंतिम लाभार्थी) उसनवारीने देईल किंवा गुंतवणूक करेल किंवा अंतीम लाभार्थींच्या वतीने कोणतीही हमी प्रतिभूती व तत्सम प्रकारात गुंतवणूक करेल याची जाणीव ठेवून कोणताही निधी, अग्रिम, ऋण किंवा गुंतवणूक (कर्जाऊ निधीतून किंवा भाग प्रव्याजी किंवा इतर अन्य स्त्रोत किंवा निधीचे प्रकारातून) केलेला नाही.

**(ब)** व्यवस्थापनाने अभिवेदन केले आहे की, त्यांच्या माहिती व विश्वासाप्रमाणे लेख्याचे टिपणीत प्रकटन केल्या व्यतिरीक्त समुहाला कोणतीही व्यक्ती किंवा विदेशी संस्थासह (निधी पुरविणारे पक्षकार) संस्था यांचेकडून अभिलिखित किंवा अन्यथा समुह प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष इतर व्यक्ती किंवा संस्था यांना उसनवारीने देईल किंवा गुंतवणूक करेल, कोणत्याही पध्दतीने ओळख असलेल्या किंवा निधी पुरविणाऱ्या पक्षकाराच्या वतीने ("अंतिम लाभार्थी") किंवा अंतिम लाभार्थींच्या वतीने कोणतीही हमी, प्रतिभूती किंवा तत्सम प्रकारात गुंतवणूक करेल याची जाणीव ठेवून कोणताही निधी समुहाला प्राप्त झालेला नाही, आणि

**(क)** सांयुक्तिक आणि समर्पक मानण्यात आलेल्या अशा लेखापरीक्षा पध्दतीवर आधारित परिस्थितीत नियम ११ (इ) चे उपकलम (१) आणि (ii) अंतर्गत उपरोक्त (अ) आणि (ब) अंतर्गत केलेले अभिवेदन यात कोणतेही विशेष असत्यकथन अंतर्भूत आहे असा आम्ही विश्वास ठेवण्यास आमचे काहीही निर्दशनास आलेले नाही.

v) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता दिनांक ०१-११-२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये रू. ७०.०० लक्ष लाभांष मंजूर करण्यात आला, त्याचे शोधन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

vi) त्यानंतर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता रू. ३२७.५० लक्ष आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता रू. २७५.०० लक्ष लाभांष अनुक्रमे दिनांक ३०-०५-२०२३ आणि २७-०९-२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आला व त्याचे शोधन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQZ9340**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHM7200**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

# लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - अ
# (आमचे सम दिनांकाचे अहवालात मत अस्विकारणाचा आधार भाग निर्दिष्ट केल्याप्रमाणे)
# वित्तीय वर्ष २०२२-२३

१. मृत साठा (स्थिर संपत्ती) कंपनीद्वारे संपत्ती, यंत्रे व उपकरणे यावर योग्य नियंत्रण ठेवण्याकरीता नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. कंपनीद्वारे सदर नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्यामुळे भौतिक तपासणीकरीता कंपनीद्वारे किंवा आमचेद्वारे वास्ताविक स्थिती निश्चित करता येत नाही. आमचे असे निदर्शनास आले की, काही संपत्ती ज्या लेखाखातेनुसार उपलब्ध आहेत परंतू उपयोगात नाही, जर अप्रचलित असतील, उदा. विद्युत बस त्यांचे निर्लेखन करणे आवश्यक आहे. कंपनीने लेखाखातेमध्ये नोंदविलेल्या तारखेच्या आधारावर संपत्तीवरील घसारा आकारलेला आहे, जो बरोबर नाही, कारण तयार / उपयोगास सुरूवात केलेली दिनांक आणि खरेदीची दिनांक यामध्ये महत्वाचे वेळेचे अंतर असल्याने परीणामी चुकीचा घसारा आकारण्यात आला.

उपरोक्त् परिस्थितीत कंपनीने संपत्ती, यंत्रे व उपकरणे यावर योग्य नियंत्रण ठेवले आहे याबाबत आम्ही स्वत:स समाधानी करण्यास असमर्थ आहोत, त्यामुळे याचा वित्तीय परीणाम, जर काही असेल तर तो निश्चित करता येऊ शकत नाही.

२. आमच्या तपासणीमध्ये आम्हास असे निदर्शनास आले होते की वर्षभरात करण्यात आलेला खर्च हा मंजूरी देणा-या प्राधिकरणाच्या वित्तीय अधिकाराच्या कक्षेच्या बाहेर आहे, त्यामुळे कंपनीद्वारे करण्यात आलेला खर्च आणि त्याचा वित्तीय परीणाम यावर आम्ही टिपणी करण्यास असमर्थ आहोत.

३. आमच्या तपासणीमध्ये आम्हास असे निदर्शनास आले होते की मनुष्यबळ पुरविणा-या संस्थेच्या देयकाची योग्य पडताळणी करण्यात आली नाही ज्यामुळे त्यांना जास्तीचे शोधन करण्यात आले. त्याचा वित्तीय परीणाम व्यवस्थापनद्वारे निश्चित करण्यात आला नसल्याने त्याच्या वित्तीय परीणामाबद्दल आम्ही टिपणी करण्यास असमर्थ आहोत.

४. कंपनीकडे प्राप्ती आणि देय यांच्या शिल्लक थकबाकीबाबत पुष्टीकरण उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांच्या वास्तविक स्थिती आणि निष्पक्षता तसेच त्याच्या वित्तीय परीणामाबाबत टिपणी करण्यास असमर्थ आहोत.

५. आमच्या मते एस्सेल वर्ल्ड समुहास वस्तु व सेवा करापोटी रू. ९८३७७२९.०० रकमेचे केलेले शोधन हे न्यायसंगत नाही कारण एस्सेल वर्ल्ड ग्रुपद्वारे देण्यात आलेली सेवा संयुक्त उपक्रमात भागधारक म्हणून दिलेली आहे आणि त्यामुळे सदर शोधन त्यास्तरापर्यंत जास्तीचे झाले आणि प्रगतीपथावरील कामे वाढली आहेत.

कंपनीद्वारे अतिथींना प्राणीसंग्रहालयाची नि:शुल्क फेरी करण्यात आली ज्याचा कंपनीद्वारे वित्तीय परीणाम निश्चित व प्रकट करण्यात आला नाही ज्यामुळे त्याच्या वित्तीय परीणामाबाबत आम्ही टिपणी करण्यास असमर्थ आहोत.

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQZ9340**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHM7200**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

## लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - "ब"
## (आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०२२-२३

(फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेडच्या सभासदांना प्रेषित केलेल्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाच्या कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रावरील आमचे सम दिनांकाचे अहवालातील निर्दिष्ट)

आम्ही मागितलेल्या आणि कंपनीने दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणाच्या बाबतीत आणि कंपनीद्वारे देण्यात आलेल्या आणि खातेपुस्तक व अभिलेख यांचे लेखापरिक्षणाचे सामान्य तपासणीमध्ये आणि आमचे माहिती व विश्वासानुसार, आम्ही कथन करतो की :

xxi) कंपनींच्या एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात कंपनींच्या (लेखापरिक्षकांचा अहवाल) आदेश (CARO) अहवालात संबंधीत लेखापरिक्षकांनी दिलेली पात्रता आणि प्रतिकुल शेरे समाविष्ट आहेत ते पुढीलप्रमाणे :

| अ. क्र. | कंपनीचे नाव | सूत्रधारी / सहाय्यक | **CARO** अहवालाचा खंड क्र जो पात्र किंवा प्रतिकुल आहे |
|---|---|---|---|
| १ | फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड | सूत्रधारी | 3(i)(c), 3(vii)(b) |
| २ | एफडीसीएम गोरेवाडा झु लिमिटेड | सहाय्यक | 3(i)(a)(A), 3(i)(b), 3(i)(c) |

**शाह बाहेती चांडक आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए जय पोपटानी)**
**भागीदार**
**स.क्र.१३५०३८**
**UDIN : 23135038BGZDQZ9340**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

**सी.एन. पटेल आणि कंपनी**
**सनदी लेखापाल करिता**
**संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू**

**स्वाक्षरित**
**(सीए मिलींद पटेल)**
**भागीदार**
**स.क्र.१०९९७४**
**UDIN : 23109974BGUIHM7200**

**स्थळ : नागपूर**
**दिनांक : २८.१२.२०२३**

## स्वतंत्र लेखा परीक्षकांच्या अहवालाचे सहपत्र - "क"
## (आमचे सम दिनांकाचे अहवालात निर्दिष्ट केल्याप्रमाणे) वित्तीय वर्ष २०२२-२३

### कंपनी अधिनियम २०१३ ("कायदा") कलम १४३ पोटकलम ३ चे उपकलम (i) अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर अहवाल

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड ("कंपनी") च्या दिनांक ३१ मार्च २०२३ रोजीच्या आर्थिक प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे त्याच दिवशी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीच्या एकत्रिकृत वित्तीय विवरण पत्राच्या आमच्या लेखापरीक्षणासोबत आम्ही लेखापरीक्षण केले आहे.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणाकरिता व्यवस्थापनाची जबाबदारी :**
आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधाने (इंस्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊन्टट्स ऑफ इंडिया) भारतीय सनदी लेखापालाच्या संस्थेने (ICAI) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक टिपणीत नमूद केल्यानुसार कंपनीने आर्थिक प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे आधारे स्थापित केलेले अंतर्गत वित्तीय नियंत्रण सुस्थितीत ठेवण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदारीमध्ये कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे कंपनीच्या व्यवसायाचे सुस्थितीत व कार्यक्षम संचालनाची खात्री करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रण योजनेची आखणी, अंमलबजावणी व परिचलन, कंपनीच्या धोरणांचा अवलंब, संपत्तीची सुरक्षा, फसवणूक आणि चुकांचा प्रतिबंध आणि तपास, लेखाविषयक अभिलेखाची अचूकता व पूर्णत्व आणि विश्वसनीय वित्तीय माहितीची वेळेवर तयारी इत्यादिचा अंतर्भाव आहे.

**लेखापरीक्षकांची जबाबदारी :**
| सी) अल्पसंख्य हितसंबंध यांनी धारण केलेले मतदान अधिकाराचे प्रमाण | ०% |

**(रूपये लाखात)**

| विवरण | **चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२३ करिता आकडे** | **मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१ मार्च, २०२२ करिता आकडे** |
|---|---|---|
| अल्पसंख्य हितसंबंध (%) | ०% | ४९% |
| पालकांचे नियंत्रित हितसंबंध (%) | १००% | ५१% |
| संक्षिप्त ताळेबंद | | |
| अचल संपत्ती | २९५४.८७ | २०९६.३४ |
| चल संपत्ती | ३६८.०२ | ६२५.०२ |
| एकूण संपत्ती | ३३२२.८९ | २७२१.३६ |
| चल देयता | १२०.३१ | ५५०.२० |
| निव्वळ संपत्ती | ३२०२.५८ | २१७१.१६ |
| समभाग | ३२०२.५८ | २१७१.१६ |
| संचित अल्पसंख्य हितसंबंध | ०.०० | १०६३.८७ |
| संचित पालकांचे नियंत्रित हितसंबंध | ३२०२.५८ | ११०७.२९ |
| **नफा / (तोटा) अनियंत्रित हितसंबंधास कारणीभूत** | | |
| सर्वसमावेशक उत्पन्न | निरंक | निरंक |
| सहाय्यक कंपनीचा नफा / (तोटा) | २६२.९१ | ३२.२० |
| नफा / (तोटा) अल्पसंख्य हितसंबंधास कारणीभूत | ०.०० | १५.७८ |
| नफा / (तोटा) पालकांचे नियंत्रित हितसंबंधास कारणीभूत | २६२.९१ | १६.४२ |
| **उपकंपनीचे रोख प्रवाह** | | |
| चालू कार्यविधीपासून रोख प्रवाह | (५३.०३) | (४९.८६) |
| गुंतवणूक कार्यविधीपासून रोख प्रवाह | (७२०.८०) | (४५९.५८) |
| वित्तीय कार्यविधीपासून रोख प्रवाह | ७७४.६१ | ५१५.८० |
| | | |
| रोख आणि रोख समतुल्यमध्ये निव्वळ वाढ / घट | ०.७८ | ६.३६ |

# महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित

**(सीआयएन : यु४५२००एमएच१९७४एसजीसी०१७२०६)**

## दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचे एकत्रिकृत वित्तीय विवरण पत्राशी संबंधित असलेली टिपणी

### टिपणी - २२ महत्वाच्या लेखाविषयक धोरणांचा सारांश.

**पार्श्वभूमी :-**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड ("एफडीसीएम" किंवा दि कंपनी) ही भागाव्दारे मर्यादित कंपनी असून या कंपनीची स्थापना कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत दि. १६.०२.१९७४ रोजी झालेली आहे आणि वास्तव्य भारतात आहे. कंपनीचे पंजीकृत कार्यालय एफडीसीएम भवन, ३५९/ब, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर, महाराष्ट्र ४४००३६ येथे आहे. कंपनी वनांचा विकास, वानिकी आणि इतर संलग्न कार्यविधीच्या व्यवसायात कार्यरत आहे.
कंपनीची एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड (यापूर्वी एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड या नांवाने ओळखली जाणारी) ही (सहाय्यक कंपनी) सहाय्यक कंपनी आहे. सहाय्यक कंपनीची स्थापना भारतात कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत दिनांक १४ नोव्हेबर २०१८ रोजी झाली आहे.

**ए) एकत्रीकरणाचा आधार :-**

एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात कंपनी आणि कंपनीव्दारे नियंत्रित सहाय्यक कंपनीच्या वित्तीय विवरणपत्राचा समावेश आहे. सहाय्यक कंपन्या कंपनीव्दारे नियंत्रित संस्था असतात. ज्यावेळी सूत्रधारी कंपनीस सहाय्यक कंपनीच्या चुका उघडकीस आणण्याचे अधिकार असतात किंवा सहाय्यक कंपनीसोबत असलेल्या संबंधामुळे परिवर्तनशील प्राप्तीवर अधिकार प्राप्त होतो आणि सहाय्यक कंपनीवर आपल्या अधिकाराचा वापर करुन अशा प्राप्तीवर परिणाम करण्याची क्षमता असते त्यावेळी नियंत्रण अस्तित्वात असते. अस्तित्वात असलेल्या अधिकारान्वये शक्तीचे प्रयोग निर्देशन होत असते ज्याव्दारे संबंधित कार्यविधी निर्देशित करण्याची क्षमता प्रदान केली जाते व जे संस्थेच्या प्राप्तीवर महत्वपूर्ण परिणाम करतात. नियंत्रण सुरु होण्याचे दिनांकापासून नियंत्रण समाप्त होण्याचे दिनांकापर्यंत सहाय्यक कंपन्याची वित्तीय विवरणपत्रे एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात समाविष्ट केली जातात.

पूर्ण स्वामित्व असलेल्या सहाय्यक कंपन्यासोबत सूत्रधारी कंपनीच्या संपत्ती, देयता, समभाग, प्राप्ती, खर्च आणि रोखप्रवाह यासारख्या समान बाबी एकत्रित करुन सहाय्यक कंपन्याचे एकत्रिकरण करण्यात येते. अंतर्गत कंपनी आधिक्य (Intra - Company) आणि व्यवहार ज्यात अशा व्यवहारापासून अप्राप्त लाभ / हानी एकत्रिकरण करतांना वगळण्यात येतात. ही एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे कंपनीमध्ये उपयोगात असलेल्या समान लेखा विषयक धोरणाचा अवलंब करुन तयार करण्यात आली आहेत.

एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचित भारतीय लेखांकन मानका (Ind-AS) नुसार तयार करण्यात आली आहेत. आराखडा निर्मिती, बांधणी, वित्त, संचालन व हस्तांतरण (Design, Build, Finance, Operate and Transfer

(DBFOT)) ह्या तत्वावर सहाय्यक कंपनी सरकारी-खाजगी भागिदारी (PPP) आधारावर गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयाचे  विकासाची कामे करीत होती. पुढे खाजगी भागीदाराचे निर्गमनामुळे संयुक्त उपक्रम करारनामा दिनांक २६-६-२०२२ रोजी संपुष्टात आला. खाजगी भागिदाराचे निर्गमनानंतर सहाय्यक कंपनी दिनांक २९-६-२०२२ पासून एफडीसीएम लिमिटेडची पूर्ण स्वामित्व असलेली कंपनी बनलेली आहे. कंपनी (भारतीय लेखांकन मानक) नियम २०१५ आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदी आणि त्या अंतर्गत नियम सोबत वाचावे. भारतीय लेखांकन मानक ११० "एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे" नुसार एफडीसीएम च्या सहाय्यक कंपनीचे एकत्रिकृत परिणाम, एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रात समाविष्ट आहेत.

एकत्रिकृत विवरणपत्रे तयार करताना उपयोगात आणलेले सहाय्यक कंपनीचे वित्तीय विवरणपत्रे एफडीसीएमलि च्या समान प्रतिवेदन दिनांकापर्यंत म्हणजेच ३१ मार्च २०२३ पर्यंत विचारात घेण्यात आले आहे.

ज्यांचे मूल्यांकन संबंधित भारतीय लेखांकन मानकानुसार आवश्यक असल्याप्रमाणे उचित मूल्याने करण्यात आले आहे अशा ठराविक वित्तीय संपत्ती व देयता वगळता ही एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्रे लेखांकनाच्या अर्जित संकल्पनेवर आधारित ऐतिहासिक मूल्य संकेतांतर्गत तयार करुन सादर करण्यात आली आहेत.

**बी) प्राक्कलनाचा उपयोग**

सर्वसाधारणपणे स्विकृत लेखांकन तत्वांनुसार (जीएएपी) लेखाविषयक पध्दतीशी अनुरुप अशी वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना व्यवस्थापनास अंदाज आणि अनुमान करावे लागतात, त्याचा परिणाम वित्तीय विवरणपत्राचे दिनांकास प्रतिवेदित देयता आणि संभाव्य संपत्ती व देयताच्या रकमा आणि त्या प्रतिवेदित कालावधीतील प्रतिवेदित महसूल आणि खर्चाच्या रकमांवर होत असतो. सोबतच्या विवरणपत्रात उपयोगात आणलेले अंदाज आणि अनुमान व्यवस्थापनाने वित्तीय विवरणपत्राचे संबंधित वस्तुस्थितीचे व परिस्थितीचे केलेल्या मूल्यांकनावर आधारित आहेत, प्रत्यक्ष परिणाम अशा अंदाजापेक्षा भिन्न राहू शकतील.

वित्तीय विवरणपत्रे तयार करतांना उपयोगात आणलेले अंदाज हे दूरदर्शी असून वाजवी आहेत असा व्यवस्थापनास विश्वास आहे. लेखाविषयक अंदाजात काही सुधारणा झाल्यास त्या भावी प्रभावाने भविष्यातील कालावधीत विचारात घेण्यांत येतात.

अशा अंदाजाचे उदाहरणा अंतर्गत संदिग्ध ऋणाकरिता तरतूद, आयकर, संपत्ती, यंत्रे व उपकरणांचा वापरायोग्य कालावधी इत्यादिचा अंतर्भाव आहे.

**सी) रोख आणि रोख सममूल्य व बँकेतील शिल्लक**

ताळेबंदातील रोख आणि रोख सममूल्य यात बँकेतील शिल्लक, हस्तस्थ रोख, आणि पोस्टाची तिकीटे, तसेच हस्तस्थ धनादेश/धनाकर्ष इत्यादि समाविष्ट आहेत. यामध्ये तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे मूळ परिपक्वता असलेलेल्या मुदती ठेवीचा समावेश आहे.

ताळेबंदात दर्शविलेली बँकेतील शिल्लक यामध्ये तीन महिन्यापेक्षा जास्त परंतु बारा महिन्यापेक्षा जास्त कालावधीची परिपक्वता नसलेल्या मुदती ठेवीचा अंतर्भाव आहे.

**डी) विभाजनीय व्यय**

व्यवस्थापनाचे अंदाज आणि गृहीतक यांचे आधारावर ठराविक कर्मचारी लाभ खर्च, घसारा व इतर खर्च विभाजनीय व्यय म्हणून संबोधण्यात येतो. अशा खर्चा पैकी ९०% खर्च राबविण्यात येणा-या निश्चित केलेल्या ठराविक दिर्घमुदती रोपवन कार्यविधी अंतर्गत भांडवलीकरण आणि उर्वरित विक्री केलेल्या मालाची किंमत अशा कार्यविधी अंतर्गत चालू वर्षातील क्षेत्रीय कामावरील खर्चाचे प्रमाणात वाटणी करण्यात आला आहे.

**ई) प्रत्यक्ष खर्च**

कार्यक्रमांशी प्रत्यक्ष संबंध असलेला आणि त्या कार्यक्रमाकरिता झालेला खर्च साधारणपणे अशा संबंधित कार्यक्रमावर खर्ची टाकण्यांत येतो. अशा खर्चात मजुरी, साहित्य, आस्थापना व इतर वरकड खर्चाचा अंतर्भाव आहे.

भांडार साहित्य व सुटया भागाचे खरेदीवरील या वर्षातील खर्च हा संबंधित लेखा शिर्षाअंतर्गत चालू वर्षात खर्ची टाकण्यांत आला आहे.

**एफ) जैविक संपत्ती**

वानिकी रोपवनाचे बाजारमूल्य उपलब्ध नसून त्यांचे पर्यायी उचित मूल्यमापन करणे विश्वसनीय नसल्यामुळे रोपवाटीका, वानिकी रोपवने अशा जैविक संपत्तीचे मूल्यांकन परिव्यय मूल्याने करण्यात आले आहे.

जैविक संपत्तीचे भौतिक अस्तित्व / पडताळणी आणि अखंडित सनियंत्रण यासाठी व्यवस्थापनाने पदनिर्देशित क्षेत्रीय कर्मचारी / अधिकारी यांचेकडे जैविक संपत्तीच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली असल्याने त्यांचेवर पूर्ण विश्वास ठेवला आहे.

रोपवन व रोपवाटीका यांच्या नैसर्गिक वाढीतील भर / घट यांचे मूल्यांकन शक्य नसल्यामुळे जैविक संपत्तीच्या प्रत्येक संवर्गातील भर विल्हेवाट आणि इतर समायोजन दर्शविणारे प्रतिवेदन कालावधीच्या सुरुवातीस आणि अखेरीस वहनक्षम मूल्य याबाबत ताळमेळ स्वतंत्रपणे प्रकट करण्यात आलेला नाही.

रोपवाटिका आस्थापना या लेखा शिर्षाअंतर्गत आरंभीचे आधिक्य अधिक चालू वर्षातील खर्च यामधून १०% खर्च आणि रुट ट्रेनर / क्लोनल रोपवाटिका आस्थापना या लेखा शिर्षाअंतर्गत एकूण खर्चामधून २०% खर्च अनुक्रमे साग रोपवाटीका आणि रुट ट्रेनर व क्लोनल रोपवाटिका या लेखा शिर्षाअंतर्गत स्थानांतरित करण्यात आला आहे. ज्या रोपवाटिकेत कामे सुरु नाहीत अशा रोपवाटिकांचे बाबतीत अशा प्रकारचा १०%/२०% खर्च नफातोट्याचे हिशेबात निर्लेखित करण्यात आला आहे. तथापि, ज्या रोपवाटिकेत आंशिक स्वरुपात कामे सुरु आहेत अशा रोपवाटिकांच्या बाबतीत अशा १०%/२०% खर्चापैकी उद्दिष्टांच्या तुलनेत क्षमतेच्या प्रत्यक्ष वापराचे प्रमाणात खर्च निर्लेखित करण्यात आला आहे.

**जी) रोपवन खर्च व बीज भूखंड विकास खर्चाचे निर्लेखन**

i) वेगवेगळया क्षेत्रातील जिवंत रोपांची वेगवेगळी टक्केवारी लक्षात घेता, विरलनापूर्वी उभ्या असलेल्या एकूण झाडावरील सुरुवातीच्या प्रमाणशीर रोपवन खर्चाचे प्रमाणात विरलन कामात संबंधित क्षेत्रातून तोडलेल्या झाडावरील सुरुवातीचा प्रमाणशीर रोपवन खर्च निर्लेखित करण्यांत आला आहे. बांबू रोपवनाच्या सुरुवातीच्या प्रमाणशीर खर्चाचे निर्लेखन एकूण आठ कापणीमध्ये करण्यांत आले आहे. औषधी वनस्पती रोपवन खर्चाचे निर्लेखन भिन्न रोपासाठी भिन्न कालावधी विचारात घेवून उत्पादनाच्या वर्षात करण्यांत आले आहे. शासनास किंवा प्रकल्प प्राधिकरणास आदेशानुसार हस्तांरित करण्यांत आलेल्या रोपवनाचे बाबतीत सुरुवातीचे एकूण रोपवन खर्च लेख्यात निर्लेखित/समायोजित करण्यांत आला आहे. बीज घटकाअंतर्गत बीज भूखंडा संबंधाने विकास कामावरील खर्च त्या शिर्षाअंतर्गत सुरुवातीच्या आधिक्याचे २०% या दराने निर्लेखित करण्यांत आला आहे.

ii) ताळेबंदात जैविक संपत्ती म्हणून अंतर्भूत केलेल्या रोपवन खर्चाची चालू वसुली योग्य एकूण किंमत जोपर्यंत अंदाजित केलेल्या एक अथवा अधिक भागातील नुकसान भरुन काढण्यासाठी पुरेशी आहे तोपर्यंत अशा काही भागातील अयशस्वी रोपवने निर्लेखित करण्यात आलेली नाहीत.

**एच) संपत्ती, यंत्रे व उपकरणे आणि प्रगतीपथावरील भांडवली कामे**

मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही प्रकारच्या संपती, यंत्रे व उपकरणे संपादित मूल्य / बांधकाम मूल्य यातून संचित घसारा कमी करुन दर्शविण्यात आल्या आहेत. संपत्ती मूल्यात खरेदी किंमत, कर, शुल्क, भाटक व संपत्ती उद्देशित उपयोगासाठी चालू स्थितीत आणण्यासाठी लागणा-या इतर प्रत्यक्ष खर्चाचा समावेश आहे. महत्वाच्या प्रकल्पाकरिता इतर पूर्व तयारी वरील खर्चाचे सुध्दा उचित ठिकाणी भांडवलीकरण करण्यात आले आहे.

प्रगतीपथावरील भांडवली कामात संपत्ती, यंत्रे व उपकरणे संपादित करण्यांसाठी दिलेल्या अग्रिमाचा तसेच ज्या संपत्ती यंत्रे व उपकरणे उद्देशित उपयोगासाठी वर्षअखेर अजून तयार नाहीत त्यावरील खर्चाचा अंतर्भाव आहे.

ताळेबंदाच्या दिवशी हस्तस्थ आणि उपयोगात न आलेल्या बांधकाम साहित्याची किंमत "प्रगतीपथावरील भांडवली कामे" या स्वतंत्र लेखाशिर्षाअंतर्गत समाविष्ट आहे.

**आय) घसारा आणि परिशोधन**

कंपनी अधिनियम २०१३ च्या परिशिष्ट II मध्ये विहित केल्यानुसार मूर्त संपत्ती यंत्रे व उपकरणांचे वापरायोग्य आयुष्य विचारात घेवून त्याआधारे घसा-यांची तरतूद करण्यात आली आहे.

कंपनी अधिनियम २०१३, लागू झाल्यानंतर कंपनीने परिशिष्ट II मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार अंदाजित वापरायोग्य कालावधीचे प्रयोजन केले आहे. त्यानुसार संपत्तीचे शिल्लक वहनक्षम मूल्य सुधारीत उर्वरित वापरायोग्य कालावधी मध्ये अवक्षयित करण्यात येत आहे.

संपत्तीची भर किंवा घट यासबंधाने पूर्ण महिना आधारभूत धरुन भर / घटीचे संबंधात प्रमाणशीर घसा-याची परिगणना करण्यात आली आहे. वापरास अयोग्य घोषित परंतु विक्री न झालेल्या संपत्तीवर वापरास अयोग्य घोषित केल्यानंतर घसा-याची आकारणी करण्यात

आलेली नाही. तसेच प्रकल्प प्राधिकरणास किंवा शासनास, आदेशानुसार स्थानांतरीत केलेल्या स्थिर संपत्तीचे निर्लेखन अवक्षयित मूल्याने करण्यात आले आहे.

प्रत्येकी रु. ५०००/- (पांच हजार) पर्यंत किंमतीच्या संपत्ती, खरेदीचे वर्षात पूर्णपणे अवक्षयित करण्यात येतात.

**<u>एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड (यापूर्वी एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड नांवाने ओळखली जाणारी) संबंधाने-</u>**

संपत्तीचे संपादन करतेवेळी किंवा त्यानंतरच्या पुनर्विलोकनानुसार उर्वरित वापरायोग्य अंदाजित आयुष्य उपरोक्त सूचीत अंतर्भूत वापरायोग्य आयुष्यापेक्षा कमी किंवा अधिक असेल अशावेळी व्यवस्थापनाचे अंदाजावर आधारित वापरायोग्य आयुष्य / उर्वरित वापरायोग्य आयुष्य विचारात घेवून कमी / अधिक दराने अवक्षयनाची तरतूद करण्यात आली आहे.

ह्या धोरणास अनुसरुन संपत्ती, यंत्रे व उपकरणे वापरायोग्य आयुष्यावर खालील प्रमाणे अवक्षयित करण्यात आली आहेत.

| अवक्षयन योग्य संपत्ती | वापरायोग्य आयुष्य |
|---|---|
| ईमारती व रस्ते | ३ ते ६० वर्ष |
| यंत्रे व संयंत्रे | ३ ते १५ वर्ष |
| कार्यालयीन उपकरणे | ३ ते ५ वर्ष |
| संगणके व आकडेवारी संस्करण उपकरणे | ३ ते ६ वर्ष |
| उपस्कर व जोडकाम | ५ ते ८ वर्ष |
| वाहने | ८ ते १० वर्ष |
| पशुधन / पक्षी | ५ ते ७० वर्ष |

या वर्षातील संपत्तीवरील घसा-याची रक्कम व्यवहार्यता अंतर निधी (Viability Gap Fund (VGF)) म्हणून नफा तोट्याचे हिशेबात समाकलित करून प्राणी संग्रहालयाच्या संपत्तीच्या बांधकामासाठी शासनाकडून प्राप्त निधी खात्यात खर्ची (Debit) टाकण्यात आली आहे. तसेच व्यवहार्यता अंतरनिधी (VGF) व्यतिरिक्त संपत्तीवरील घसा-याची रक्कम नफा तोट्याचे हिशेबात खर्ची (Debited) टाकण्यात आली आहे.

## जे) संपत्तीचे नुकसान

प्रत्येक ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीच्या वहनक्षम मूल्यात काही नुकसान झाले किंवा कसे हे ठरविण्यासाठी अशा वहनक्षम मूल्याचा आढावा घेण्यात येतो त्यात काही संपत्तीचे वहनक्षम मूल्य वसुलीयोग्य मूल्यापेक्षा अधिक असल्यास त्या मर्यादेपर्यंत नुकसान वगैरे असल्यास नुकसानीसाठी तरतूद करण्यात येते. संपत्तीचे वसुलीयोग्य मूल्य हे निव्वळ विक्रीमूल्य तसेच वापरातील मूल्यापेक्षा जास्त आहे. संपत्तीच्या सतत वापरानंतर आणि वापरायोग्य कालावधी संपल्यानंतर अशा संपत्तीच्या विल्हेवाटीपासून प्राप्त होणारा भविष्यातील अंदाजित अपेक्षित रोख प्रवाह हे संपत्तीचे वापरातील सध्याचे मूल्य आहे. बिघाडामुळे झालेले नुकसान नफातोट्याचे हिशेबात अथवा पुर्नमूल्यांकन संचिती मधून, जे लागू असेल त्याप्रमाणे विचारात घेण्यात येते.

**के) अनुदानाचे लेखांकन**

शासकीय अनुदानाशी संबंधित संलग्न अटीचे अनुपालन करण्यांत येईल आणि अनुदान प्राप्त होईल यासंबंधाने पुरेशी खात्री असेल तरच असे अनुदान कंपनीद्वारे मान्य करण्यांत येते. प्रवर्तकाचे अंशदान या स्वरुपातील शासन अनुदान हे संचिती अंतर्गत जमा करण्यांत येते व भागधारकाच्या निधीचा भाग म्हणून संबोधण्यात येते.

उत्पन्नाशी संबंधित शासकीय अनुदान, ज्या संबंधित खर्चाची भरपाई उद्देशित आहे त्या मर्यादेपर्यंत आवश्यक कालावधी मध्ये नफा तोटा पत्रकात पध्दतशीर आधारावर दर्शविण्यात येते. असे अनुदान एकतर उत्पन्नांतर्गत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येते किंवा संबंधित खर्च प्रतिवेदित करताना कमी करण्यात येते.

विनिर्दिष्ट कार्यविधीसाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी संबंधित कार्यविधीच्या निधी लेख्यात जमा करण्यांत आला आहे.

**एल) गुंतवणूक**

चालू गुंतवणूक अशी गुंतवणूक आहे की, ज्याचे स्वरुप त्वरीत वसुलीयोग्य आहे आणि ज्या मागील हेतू गुंतवणूक केल्याचे दिनांकापासून एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी ठेवण्याचा नाही.

**एम) संशोधन व विकास खर्च**

प्रायोगिक तत्वावर कंपनीमध्ये किंवा अन्यथा "संशोधन व विकास" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेला खर्च ज्या वर्षात करण्यात आला त्याच वर्षी पूर्णपणे नफातोटयाचे हिशेबात सदर लेखाशिर्षाअंतर्गत खर्ची टाकण्यात आला आहे.

**एन) महसूल मान्यता**

मालाच्या विक्रीपासूनचे उत्पन्न महत्वाची जोखीम व स्वामित्वाचा मोबदला खरेदीदारांकडे स्थानांतरीत केल्यानंतरच मान्य करण्यात येते आणि व्यापारी कसर व सूट विचारात घेवून निव्वळ रकमेने दर्शविण्यांत आले आहे.

शासन / इतर यंत्रणा यांचेकडून प्राप्त झालेल्या निधीवर अर्जित व्याज निधी पुरविणा-या यंत्रणाकडून कोणत्याही स्पष्ट सूचना अभावी कंपनीचे उत्पन्न म्हणून संबोधण्यांत आले आहे.
"टर्न की" आधारावर घेतलेल्या रोपवन प्रकल्पाचे बाबतीत लाभ किंवा हानीची परिगणना कंपनीद्वारे ज्या वर्षात प्रकल्प पूर्ण झाला/करार समाप्त झाला त्या वर्षात करण्यात आली आहे.

**एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड (पूर्वी एफडीसीएम एस्सेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड नांवाने ओळखली जाणारी) संबंधाने:-**

ग्राहकासोबत केलेल्या संविदापासून उत्पन्नात तिकीट विक्री, अन्न व पेय पदार्थाची विक्री आणि त्या सेवेशी संबंधित तरतूदीचा अंतर्भाव आहे.
खालीलपैकी एखाद्या निकषाची पूर्तता होत असल्यास कंपनी वेळेनुसार कार्याचे उत्तरदायित्व पूर्ण करुन उत्पन्नास मान्यता देते.

a. कंपनीच्या कार्यामुळे कंपनीसाठी पर्यायी वापरासह एखाद्या संपत्तीची निर्मिती होत नाही आणि विशिष्ट दिनांकापर्यंत केलेल्या कामाचे शोधन करण्यासाठी अंमलात आणण्याजोगा (प्रर्वतनीय) अधिकार आहे.
b. कंपनीच्या कार्यामुळे एखाद्या संपत्तीची निर्मिती होते किंवा त्यात वाढ होते ज्यामुळे ग्राहकाच्या नियंत्रणातील संपत्तीची निर्मिती होते किंवा त्यात वाढ होते.
c. कंपनी कार्य करीत असल्याने कंपनीच्या कार्यामुळे ग्राहकांना लाभ प्राप्त होऊन एकाचवेळी उपभोग घेता येतो.

ज्यावेळी कार्याचे उत्तरदायित्वाकरिता वरील पैकी एकाही अटीची पूर्तता होत नाही अशा वेळी ज्या बिंदुवर कार्याचे उत्तरदायित्वाची पूर्तता होते त्यावेळी उत्पन्नास मान्यता देण्यात येते.

जेंव्हा कंपनी वचन दिलेली वस्तू किंवा सेवा (म्हणजे तिकीट विक्री, अन्न व पेय पदार्थांची विक्री) प्रदान करुन कार्याचे उत्तरदायित्व पूर्ण करते त्यावेळी कार्याव्दारे मोबदल्याची रक्कम प्राप्त करुन करारावर आधारित संपत्तीची निर्मिती करते. जेथे ग्राहकांकडून मिळालेली मोबदल्याची रक्कम मान्य उत्पन्नापेक्षा अधिक असते तेथे कराराचे दायित्वात वाढ होते. बहुविध कार्यदायित्वाचे प्रकरणात प्रत्येक कार्याचे उत्तरदायित्व पूर्ण झाल्यानंतरच अशा कार्यात उत्पनास मान्यता देण्यात येते.

संविदेत निश्चित प्रदानाच्या अटी विचारात घेवून आणि कर व शुल्क वगळून प्राप्त झालेला किंवा येणे असलेला मोबदला रास्त मूल्याने विचारात घेवून उत्पन्नाचे मूल्यमापन करण्यात येते.

इतर प्रकरणात (अर्थात व्याजाचे उत्पन्न) कंपनीला आर्थिक लाभ प्राप्त होऊ शकतील आणि जर लागू असेल तर उत्पन्न व खर्चाचे मूल्यांकन विश्वसनीय रितीने करता येणे संभवनीय असेल त्या मर्यादे पर्यंत उत्पन्नास मान्यता देण्यात येते.

**ओ) रजा रोखीकरण**

कंपनीद्वारे कर्मचा-यांकरिता रजा रोखीकरण निवृत्ती लाभाकरिता तरतूद करण्यात येते. कर्मचा-यांना भविष्यात रोखीकरण करण्यासाठी ठराविक मर्यादेच्या अधिन राहून रजा संचय करण्याचा हक्क आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाने कळविलेल्या वार्षिक रक्कमेच्या आधारावर देयतेची तरतूद करण्यात आली आहे.

**पी) सेवा उपदान**

भविष्यात देय असलेल्या सेवा उपदानाच्या लाभाची प्रत्येक ताळेबंदाच्या दिनांकाची देयता भारतीय आयुर्विमा महामंडळातर्फे प्रक्षेपित एकक पत (Projected Unit Credit Method) पध्दतीचा उपयोग करुन ठरविली जाते. विमागणित शास्त्रानुसार गृहीतकातील बदलामुळे उत्पन्न होणारा लाभ अथवा हानी निर्मितीच्या कालावधीचे नफातोटयाचे विवरणपत्रात दर्शविण्यांत आली आहे.

सेवा उपदानासाठी भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या गट सेवाउपदान विमा योजनेमार्फत निधी उपलब्ध होत आहे.

आयुर्विमा महामंडळाने पुरविलेल्या सेवाउपदान मुल्यांकन अहवालाचे आधारे कंपनीच्या पात्र समयश्रेणी कर्मचाऱ्यांकरीता सेवा उपदानाची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि भारतीय आयुर्विमा महामंडळाने लेखांकन मानक - १५ सुधारित २००५ विमागणितीय अधिनियम २००६ सह वाचावे. या अंतर्गत प्रमाणीकरण करण्यासाठी त्यांची असमर्थता कळविली आहे. त्यानुसार कंपनी आयुर्विमा महामंडळाने लेखांकन मानक - १५ सुधारित २००५ अंतर्गत पुरविलेल्या सेवा उपदान अहवालावर प्रतिवेदन व प्रकटन या प्रयोजनासाठी पूर्ण विश्वास ठेवत आहे.

**क्यू) वस्तू व सेवा कराची वसुली आणि शोधन**

वस्तू व सेवा कराची वसुली आणि भरणा याची नोंद त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या वेगळया लेख्यात करण्यात आली आहे. यापूर्वीच्या निर्धारण वर्षाशी संबंधित, यापूर्वी निश्चित करता येण्यासारखी नसलेली कोणतीही निर्विवाद कर मागणी ज्या वर्षात शोधन झाले किंवा आदेश प्राप्त झाले त्या वर्षात हिशेबात घेण्यांत आली आहे.

**आर) शासकीय विभाग/यंत्रणाना स्थानांतरीत क्षेत्राकरिता क्षतिपूर्ती दावे**

शासकीय विभाग/यंत्रणाकडे स्थानांतरीत करावयाच्या रोपवन व इतर संपत्तीचे क्षतिपूर्ती दाव्याची रक्कम, प्रकल्प प्रस्तावास शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर कंपनीने सादर केलेल्या दाव्याच्या आधारे करण्यांत आली आहे कंपनीची रोपवन व इतर संपत्ती शासकीय विभागास समर्पित केल्याचे प्रकरणी क्षतिपूर्तीच्या दाव्याची रक्कम खर्चाचे आधारावर दर्शविण्यांत आली आहे. येणे असलेले क्षतिपूर्ती दावे शासन आणि शासकीय यंत्रणाकडे प्रलंबित असल्याने कोणत्याहि तरतूदीसाठी संदिग्ध म्हणून संबोधण्यात आलेले नाहीत.

**एस) तरतूद आणि संभाव्य देयता**

भूतकाळातील घटनांपासून निर्मित संभवनीय दायित्व परंतु ज्याचे अस्तित्व घडणे किंवा न घडणे यावरुन निश्चित करता येईल. एक किंवा अधिक भविष्यकालीन घटना ज्या पूर्णपणे कंपनीच्या नियंत्रणात नाहीत किंवा ज्या प्रकरणात भविष्यकालीन साधनांच्या विल्हेवाटीसंबंधाने सध्याचे दायित्व मोजता येवू शकत नाही किंवा दायित्वाबाबत विश्वसनीय अंदाज करता येत नाही अशा संभाव्य देयता दर्शविण्यांत आल्या आहेत.

साधनांच्या विल्हेवाटीत अंतर्भूत आर्थिक लाभामुळे दायित्व निकाली काढता येणे शक्य असेल आणि ज्या संबंधाने निश्चित अंदाज करता येतील अशा विश्वसनीय अंदाजाचे आधारावर तरतूद करण्यात आली आहे. केलेली तरतूद आवश्यकतेपेक्षा कमी नाही तसेच वर्षाचे शेवटचे दिनांकास असलेले दायित्व निकाली काढण्यासाठी आवश्यक तरतूद योग्य अशा अंदाजाचे आधारावर ठरविण्यांत आली आहे.

संभाव्य संपत्ती विचारात घेण्यात आलेल्या नाहीत किंवा वित्तीय विवरणपत्रात प्रकटन करण्यात आलेले नाही.

**टी) उत्पन्नावरील करांचे लेखांकन**

करासंबंधाने खर्चात चालू आयकर आणि लांबणीवर टाकलेला कर भार/जमा यांचा अंतर्भाव आहे. आयकर अधिनियम १९६१ च्या तरतूदीनुसार कर देयतेची परिगणना करुन त्या आधारावर दरवर्षी चालू कराची तरतूद करण्यात येते.

ताळेबंदाच्या दिनांकास अधिनियमित किंवा कायम अधिनियमित कर दर तसेच कर नियम यांचा उपयोग करुन कर देय उत्पन्न आणि लेख्यानुसार उत्पन्न यामधील कालावधीतील फरकामुळे लांबणीवर टाकलेल्या देयतेची नोंद करण्यात आली आहे. लांबणीवर टाकलेल्या संपत्तीच्या वसुलीची वाजवी निश्चिती असल्यानंतरच त्याचा विचार करण्यात येतो.

**यु) रोख प्रवाह विवरणपत्र**

रोखप्रवाह अप्रत्यक्ष पध्दतीचा उपयोग करुन प्रतिवेदित करण्यांत आला आहे. ज्याद्वारे रोख स्वरुपात नसलेले व्यवहार पुढे ढकललेले किंवा उपार्जित भूत किंवा भविष्यातील कामापासून रोख प्राप्ती किंवा शोधन आणि गुंतवणूकीच्या किंवा वित्तीय रोख प्रवाहाशी संबंधित उत्पन्न किंवा खर्चाच्या कोणत्याही बाबी याच्या परिणामाकरिता आयकरापूर्वीचा नफा समायोजित करण्यांत आला आहे. कंपनीचे कार्य, गुंतवणूक तसेच वित्तीय कार्यविधीपासूनचा रोखप्रवाह वेगवेगळा दशविण्यात आला आहे.

**व्ही) वस्तुसूची**

जैविक संपत्तीशी संबंध असलेल्या कृषी विषयक कार्यविधी आणि निष्काषित केलेले कृषी उत्पादन / कापणीच्या ठिकाणी असलेले वनोपज यांना भारतीय लेखांकन मानक (Ind AS) -2 (वस्तुसूची) चे परिच्छेद ३ (अ) अन्वये विनिर्दिष्टपणे वगळण्यात आल्यामुळे सदर लेखांकन मानक कंपनीला लागू नाही.

वस्तुसूचीमध्ये अंतर्भूत प्रगतीपथावरील कामांचे मूल्यांकन परिव्यय मूल्यावर आधारित आहे. कापणी प्रक्रियेच्या परिणाम स्वरुप प्राप्त उत्पादन म्हणजे विक्रीसाठी तयार वनोपज मालाच्या संवरण स्कंधाचे मूल्यांकन निव्वळ वसुलीयोग्य मूल्य / रास्त मूल्याने करण्यात आले असून अशा मूल्यातील बदल त्या कालावधीच्या नफा किंवा तोट्यात विचारात घेण्यात आला आहे.

**डब्ल्यू) प्रतिभाग मिळकत**

समता भागधारकाचा संबंध असलेल्या चालू वर्षाचे नफा किंवा तोटयास या वर्षात शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यात आली आहे.

**एक्स) प्रस्तावित लाभांश**

वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता प्रलंबित असल्याने संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लाभांशाची तरतूद लेख्यात करण्यात आली नाही, समता भागधारकांनी मान्यता दिलेल्या दिनांकास भागावरील लाभांशाची नोंद देयता म्हणून करण्यात येते.

**टिपणी - २३ सहाय्यक कंपनीमध्ये गुंतवणूक**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड (FDCM Limited) ने दिनांक ३१.०३.२०२३ रोजी एफडीसीएम गोरेवाडा झू लिमीटेड (पूर्वी एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट लिमीटेड म्हणून ओळखली जाणारी) मध्ये रु. १०.०० लाख (प्रत्येकी

रुपये १०/- दर्शनी मूल्याचे १,००,००० भाग) रक्कमेचे १००% समता भाग धारण केले आहेत. कंपनीने सहाय्यक कंपनीत केलेली गुंतवणूक महाराष्ट्र शासनाकडून सदर प्रकल्पासाठी प्राप्त निधीतून करण्यांत आली असल्यामुळे एक रुपया सांकेतिक मूल्याने अभिलिखित करण्यांत आली आहे.

**टिपणी - २४ अचल संपत्तीचे हक्क विलेख**

पूर्ण स्वामित्व असलेल्या जमिनीवरील कंपनीच्या मालकीच्या अचल संपत्तीचे हक्क विलेख (Title Deeds) कंपनीच्या नावे आहेत. तथापि वन विभाग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे भाडेपट्टीवर वाटप/ हस्तांतरीत केलेल्या जमिनीवर बांधलेल्या ईमारतीच्या स्वरुपातील अचल संपत्तीची मालकी जरी कंपनीकडे असली तरी हक्क विलेख कंपनीच्या नावाने नाहीत. तपशील खालीलप्रमाणे आहे.

| संपत्तीचे वर्णन | सकल वहनक्षम मूल्य (रु. लाखात) | हक्क विलेख धारण केलेल्याचे नांव | हक्क विलेखधारक प्रवर्तक /संचालक किंवा प्रवर्तकाचे/ संचालकाचे नातेवाईक किंवा प्रवर्तक/संचालक यांचे कर्मचारी आहेत किंवा कसे ? | कोणत्या दिनांकापासून संपत्ती धारण केल्या आहेत | कंपनीच्या नावे धारण न करण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| आर सी सी फ्रेम बांधकाम | 1082.95 (1082.95)* | कोणी नाही | नाही | सुरवातीपासून | ** |
| आर सी सी फ्रेम शिवाय बांधकाम | 1542.79 (1433.67)* | कोणी नाही | नाही | सुरवातीपासून | ** |
| * मागील वर्षातील रक्कम दर्शवितात.<br>** ईमारती बांधकामे वनजमिनीवर असल्यामुळे हक्क विलेख एफडीसीएम लिमी, चे नावाने करता येत नाही. | | | | | |

संपत्ती नोंदवही ठेवण्यांत आली आहे तथापि संपत्तीला अनुक्रमांक (कोडींग /लेबल लावणे इत्यादीचे कामे प्रगतीपथावर आहे.

नाशिक प्रदेशातील तत्कालीन यावल विभागातील चोपडा येथील रु. २१.९० लाख (मागील वर्षी रु. २१.९० लाख) रकमेची जमीन व ईमारती वन विभागाच्या ताब्यात आहेत. तथापि ही संपत्ती पूर्णपणे अवक्षयित झालेली आहे. यासंबंधीचा मोबदला किंवा इतर काही असल्यास त्याबाबत अजून अंतीम निर्णय झालेला नाही. आणि त्यामुळे संपत्तीची मालकी अजूनहि कंपनीकडे आहे.

**टिपणी - २५ सेवा उपदान व रजा रोखीकरण लाभ**

**अ) एफडीसीएम लिमी., कर्मचा-यांचे संबंधाने सेवाउपदान :**

(रुपये लाखात)

| १ | गृहीतक (Assumption) | दि. ३१.०३.२०२३ रोजी | दि. ३१.०३.२०२२ रोजी |
|---|---|---|---|
| | सवलत दर | ७.२५% | ७.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| | वेतन वृध्दी | ७.००% | ७.००% |
| | | | |
| **२** | **दायित्वाचे वर्तमान मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्षाच्या सुरुवातीस दायित्वाचे वर्तमान मूल्य | ४२७६.८० | ३८७७.६५ |
| | या वर्षात सुरुवातीचे समायोजन | - | १४.८९ |
| | व्याज खर्च | २९९.३८ | २७२.४७ |
| | चालू सेवा खर्च | २३१.१६ | २०७.८१ |
| | शोधन केलेले लाभ | (९५८.८३) | (६७८.२८) |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | ३८९८.९८ | ४२७६.८० |
| | | | |
| **३** | **योजनांतर्गत मालमत्तेच्या रास्त मूल्यातील बदल दर्शविणारा तक्ता** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४७०९.४९ | ४४२४.१५ |
| | या वर्षात सुरुवातीचे समायोजन | | १५.२४ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | ३१७.१४ | ३००.७७ |
| | अंशदान | २७२.४६ | ६४७.६० |
| | शोधन केलेले लाभ | (९५८.८३) | (६७८.२८) |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर विमागणितीय प्राप्ती/नुकसान | निरंक | निरंक |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४३४०.२७ | ४७०९.४९ |
| | | | |
| **४** | **योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य दर्शविणारा तक्ता** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्षाच्या सुरुवातीस योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४७०९.४९ | ४४२४.१५ |
| | या वर्षात सुरुवातीचे समायोजन | | १५.२४ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीची प्रत्यक्ष प्राप्ती | ३१७.१४ | ३००.७७ |
| | अंशदान | २७२.४६ | ६४७.६० |
| | शोधन केलेले लाभ | (९५८.८३) | (६७८.२८) |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४३४०.२७ | ४७०९.४९ |
| | निधीची स्थिती | ४४१.२८ | ४३२.६९ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अंदाजित | निरंक | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्ती पेक्षा जास्तीची प्राप्ती | | |
| | (प्रत्यक्ष प्राप्ती दर = अंदाजित प्राप्ती दर वार्षिक नूतनीकरण दिनांक ३१ मार्च रोजी आल्यामुळे) | | |
| | | | |
| **५** | **विचारात घेतलेले विमागणितीय प्राप्ती/नुकसान** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | (४२.४७) | (५८२.२४) |
| | वर्षाकरिता विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान योजनेअंतर्गत संपत्ती | निरंक | निरंक |
| | दायित्वावर विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | या वर्षातील विचारात घेतलेली विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | | | |
| **६** | **ताळेबंद आणि नफातोटयाचे विवरणपत्रात विचारात घ्यावयाची रक्कम** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | वर्ष अखेर दायित्वाचे वर्तमान मूल्य | ३८९८.९८ | ४२७६.८० |
| | वर्ष अखेर योजनेअंतर्गत संपत्तीचे रास्त मूल्य | ४३४०.२७ | ४७०९.४९ |
| | निधीची स्थिती | ४४१.२८ | ४३२.६९ |
| | ताळेबंदात विचारात घेतलेली निव्वळ संपत्ती/(देयता) | ४४१.२८ | ४३२.६९ |
| | | | |
| **७** | **नफातोटयाच्या विवरणपत्रात विचारात घेतलेले खर्च** | **दि. ३१.०३.२०२३ रोजी** | **दि. ३१.०३.२०२२ रोजी** |
| | चालू सेवा मूल्य | २३९.१६ | २०७.८१ |
| | व्याज खर्च | २९९.३८ | २७२.४७ |
| | योजनेअंतर्गत संपत्तीवर अपेक्षित प्राप्ती | (३१७.१४) | (३००.७७) |
| | वर्षात विचारात घेतलेले निव्वळ विमागणितीय (प्राप्ती)/नुकसान | ४२.४७ | ५८२.२४ |
| | नफा तोटयाचे विवरणपत्रात विचारात घेतलेला खर्च | २६३.८७ | ७६१.७६ |

ब) कर्मचा-यांचे रजा रोखीकरण निवृत्ती लाभ भारतीय आर्युविमा महामंडळाशी संलग्न करण्यात आले आहे. तथापि यासबंधाने प्रकटीकरण करण्यासाठी आवश्यक माहिती पुरविण्यास आयुर्विमा महामंडळाने असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे भारतीय लेखांकन मानक १९ नुसार प्रकटीकरण करता येवू शकले नाही.

## टिपणी - २६ कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर)

कंपनीने कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व कार्यविधी (CSR) व्यवस्थापनासाठी एफडीसीएम सी.एस.आर. ट्रस्टची स्थापना केली आहे. एफडीसीएम सीएसआर ट्रस्टला केलेले अंशदान व सीएसआर खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| तपशील | ३१ मार्च २०२३ रोजी | ३१ मार्च २०२२ रोजी |
|---|---|---|
| चालू वर्षात खर्च करावयाची रक्कम | १९२.०० | १९८.०० |
| मागील वर्षातील उपलब्ध रक्कम | ६४.७९ | -- |
| **एकूण** | **२५६.७९** | **१९८.००** |
| चालू वर्षात एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट ला केलेल्या अंशदान स्वरुपात खर्च | -- | -- |
| सीएसआर खर्च | १५९.४० | १२८.८७ |
| मागील वर्षाच्या अखर्चीत शिल्लकमधून झालेला खर्च | ६४.७९ | -- |
| बँकेतील 'एफडीसीएम अखर्चित सीएसआर' या स्वतंत्र खात्यात स्थानांतरीत रक्कम | ३६.९० | ६४.७९ |
| २७.०७.२०२२ रोजी प्रधानमंत्री सहाय्यता निधीस शोधन केलेली रक्कम | -- | १०.०० |
| **एकूण** | **२६१.०९** | **२०३.६६** |

## टिपणी - २७ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६

कंपनीकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित दिनांक ३१.०३.२०२३ रोजी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा २००६ अंतर्गत नोंदणीकृत सूक्ष्म, लघु आणि मध्यम पुरवठाधारक/कंत्राटदार व सेवा देणारे नाहीत.

## टिपणी - २८ खंड प्रतिवेदन

कंपनीची मुख्य कार्यविधी ही रोपवन निर्मिती असल्यामुळे लेखांकनासंबंधी स्वतंत्र प्रतिवेदन देण्यायोग्य खंड नाही.

## टिपणी - २९ संबंधित पक्षकार व्यवहार प्रकटन

### (अ) संबंधित पक्षकारांची यादी

**(I) व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईक**

**व्यवस्थापकीय संचालक**

| वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|
| श्री एन वासुदेवन, माजी व्यवस्थापकीय संचालक | श्री एन वासुदेवन, व्यवस्थापकीय संचालक |
| श्री के.पी. सिंह, माजी व्यवस्थापकीय संचालक | -- |
| श्री विकास गुप्ता, व्यवस्थापकीय संचालक | -- |

**संचालक**

| वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|
| मान. श्री सुधीर मुनगंटीवार | श्री बी. व्ही. रेड्डी |
| श्री बी. व्ही. रेड्डी | श्री एम. म्हैसकर |
| श्रीमती जयश्री भोज | श्रीमती जयश्री भोज |
| डॉ. वाय.एल.पी. राव | श्री ए. सलील |
| श्री बी.एन. पिंगळे | श्री जी. साईप्रकाश |
| | श्री जी. नरवणे |

**(II) इतर (Entities) अस्तित्व**

**(अ) एफडीसीएम लि एम्प्लाइज जी जी सि ए स्किम**

**(ब) एफडीसीएम सीएसआर ट्रस्ट**

**(ब) वरील संबंधित पक्षकारांसोबत केलेल्या व्यवहाराचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.**
**व्यवस्थापकीय प्रमुख व त्यांचे नातेवाईकांसोबत केलेले व्यवहार :**

व्यवस्थापकीय संचालक हे कंपनीचे व्यवस्थापकीय प्रमुख म्हणून संबंधित पक्षकार आहेत. व्यवस्थापकीय संचालक/संचालक यांना वेतन व भत्ते तसेच बैठक शुल्काच्या शोधना व्यतिरिक्त संबंधित पक्षकार संबंधाने या वर्षात कोणतेही व्यवहार नाहीत.

व्यवस्थापकीय प्रमुख यांना शोधन केलेले वेतन व भत्ते

| अ.क्र. | व्यवस्थापकीय प्रमुख | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १. | श्री एन. वासुदेवन<br><br>(कालावधी) | १२.२८<br><br>(०१.०४.२०२२ ते ३१.०७.२०२२) | ३४.२५<br><br>(०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२) |
| २. | श्री के.पी. सिंह<br><br>(कालावधी) | ५.८९<br><br>(११.०८.२०२२ ते ३०.०९.२०२२) | -- |
| ३. | श्री विकास गुप्ता<br><br>(कालावधी) | १९.७१<br><br>(०१.१०.२०२२ ते ३१.०३.२०२३) | -- |

**व्यवस्थापकीय प्रमुख यांना शोधन केलेले बैठक शुल्क :**

(रक्कम रुपयात)

| नामनिर्देशित संचालक | वर्ष २०२२-२०२३ | वर्ष २०२१-२०२२ |
|---|---|---|
| श्री बी. वेणूगोपाल रेड्डी | रु. १५००/- | रु. १०००/- |
| श्री बी.एन. पिंगळे | रु. १५००/- | -- |
| श्रीमती जयश्री भोज | -- | रु. ५००/- |
| डॉ. वाय.एल.पी. राव | रु. १५००/- | -- |
| श्री जी. साईप्रकाश | -- | रु. १०००/- |
| श्री गजेंन्द्र पी. नरवणे | -- | रु. १५००/- |

**सामाईक नियंत्रणा अंतर्गत (Entity) अस्तित्व सोबत व्यवहार**
**इतर संस्थाना (Entities) योगदान**

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशील | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १ | एफ.डी.सी.एम. लि. एम्प्लॉइज जी.जी. सी. ए. स्किम | रु. २९५.१० | रु. ६४३.३१ |

**टिपणी - ३० प्रती भाग मिळकत**

समता भाग धारकांचा संबंध असलेल्या कालावधीकरीता निव्वळ नफ्यास या कालावधीत शिल्लक असलेल्या समता भागाचे भारित सरासरीने भागून मूळ प्रतिभाग मिळकतीची परिगणना करण्यात आली आहे. तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रती भाग मिळकत | २०२२-२३ | २०२१-२२ |
|---|---|---|
| समता भागधारकांशी संबंधित नफा/तोटा | रु. ११८५५.८२ लाख | रु. ५४६५.२७ लाख |
| भारित सरासरी समता भागाची संख्या | ३,२३,१२,३४८ | ३,२३,१२,३४८ |
| रु. १००/- चे प्रती भाग मूळ/मिश्रीत मिळकत (रक्कम रुपयात) | रु. ३६.६९ | रु. १६.९१ |

## टिपणी - ३१ लांबणीवर टाकलेली कर संपत्ती

(रुपये लाखात)

| **तपशील** | **चालू वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१.०३.२०२३ अखेरचे आकडे** | **मागील वर्ष प्रतिवेदन कालावधी ३१.०३.२०२२ अखेरचे आकडे** |
|---|---|---|
| **लांबणीवर टाकलेली कर संपत्ती** | | |
| संदिग्ध ऋणाकरिता तरतूद | ९७.३५ | ७१.६६ |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंशदान तरतूद | -- | ०.४२ |
| **एकूण** | **९७.३५** | **७२.०८** |
| **लांबणीवर टाकलेली कर देयता** | | **--** |
| संपत्ती यंत्रे व उपकरणावरील घसारा | १.१९ | २.५८ |
| लांबणीवर टाकलेली कर संपत्ती/देयता (निव्वळ) | ९६.१६ | ६९.५० |
| चालू वर्षी लांबणीवर टाकलेला कर | (२६.६६) | (२०.४३) |

## टिपणी - ३२ बँकेतील शिल्लक/बँक हमी

अल्पमुदती ठेवी रु. निरंक (मागील वर्षी रु. निरंक) बँक हमी घेण्यासाठी बँकाकडे तारण ठेवण्यांत आलेल्या आहेत.

## टिपणी - ३३ संपत्तीची हानी

संपत्तीचे बिघाड/नुकसान याबाबत सुचना आहे किंवा कसे यासंबंधाने ताळेबंदाचे दिवशी कंपनीने संपत्तीचे निर्धारण केले आहे. ताळेबंदाच्या दिवशी संपत्तीला बिघाड/हानी झाल्याबाबत कोणतीही सूचना नाही.

टिपणी - ३४ कालावधीनिहाय व्यापारी येणे

(रुपये लाखात)

| तपशील | ६ महिन्यापेक्षा कमी | ६ महिने - १ वर्ष | १ ते २ वर्ष | २ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च २०२३ रोजी कालावधीनिहाय अनुसूची | | | | | | |
| (i) निर्विवाद व्यापारी येणे- प्रति प्राप्य | २९१३.६३ | १०६६.१६ | ३७७.९८ | ३६१.१६ | २१.१७ | **४७४०.१०** |
| (ii) निर्विवाद व्यापारी येणे- संदिग्ध | | | | | १४६९.७७ | **१४६९.७७** |
| (iii) विवादग्रस्त व्यापारी येणे-प्रति प्राप्य | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (iv) विवादग्रस्त व्यापारी येणे-संदिग्ध | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३१ मार्च २०२२ रोजी कालावधीनिहाय अनुसूची | | | | | | |
| (i) निर्विवाद व्यापारी येणे- प्रति प्राप्य | ४९६१.०१ | ५९८.१२ | ३६१.९७ | ५०९.६२ | ३४.८९ | **६४६५.६१** |
| (ii) निर्विवाद व्यापारी येणे- संदिग्ध | | | | | १००६.२५ | **१००६.२५** |
| (iii) विवादग्रस्त व्यापारी येणे-प्रति प्राप्य | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (iv) विवादग्रस्त व्यापारी येणे-संदिग्ध | -- | -- | -- | -- | -- | -- |

टिपणी - ३५ कालावधीनिहाय व्यापारी येणे

(रुपये लाखात)

| तपशिल | १ वर्षापेक्षा कमी | १ - २ वर्ष | २ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च २०२३ रोजी कालावधीनिहाय अनुसूची | | | | | |
| (i) सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग | -- | -- | -- | -- | -- |
| (ii) ईतर | २४.४८ | -- | -- | ८.७७ | **३३.२५** |
| (iii) विवादग्रस्त देणी (सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग) | -- | -- | -- | -- | -- |
| (iv) विवादग्रस्त देणी ईतर | -- | -- | -- | -- | -- |
| ३१ मार्च २०२१ रोजी कालावधीनिहाय अनुसूची | | | | | |
| (i) सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग | -- | -- | -- | -- | -- |
| (ii) ईतर | २०.३३ | ०.१३ | ०.१२ | ८.७७ | **२९.३५** |
| (iii) विवादग्रस्त देणी (सुक्ष्म उद्योग आणि लघु उद्योग) | -- | -- | -- | -- | -- |
| (iv) विवादग्रस्त देणी ईतर | -- | -- | -- | -- | -- |

**टिपणी - ३६ भांडवली वचनबध्दता**

अ) भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या करारांची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम रू. निरंक (मागील वर्षी रू. निरंक) आहे कारण भांडवली कामासाठी कोणतेही विशिष्ट करार देण्यात आलेले नाही. चालू भांडवली कामावर झालेला खर्च हा प्रारंभिक कामे जसे सर्वेक्षणाशी संबंधीत आहे.

एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड (यापूर्वी एफडीसीएम एस्सेलवर्ल्ड गोरेवाडा झू प्रायवेट लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) बाबत भांडवली वचनबद्धता

ब) भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम रुपये ११९७.७२ लाख (मागील वर्षी रुपये ४५०.३६ लाख) सहाय्यक कंपनीचा एफडीसीएम लिमी., मध्ये समावेश झाल्यानंतर बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा झूलॉजिकल पार्कशी संबंधित निविदा काढल्या. रुपये ३९३७.४७ लाख (मागील वर्षी रुपये २१२०.४६ लाख) रक्कमेचे कार्यादेश पक्षकारांना निर्गमित करण्यांत आले, त्यापैकी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत रुपये २७३९.७५ लाख (मागील वर्षी रुपये १५६४.३५ लाख) रक्कमेचे शोधन करण्यात आले आहे.

**टिप्पणी - ३७ संभाव्य देयता**

तरतुद न केलेली संभाव्य देयता आणि कंपनी विरुध्द केलेल्या दाव्याचे संबंधात न स्विकारलेल्या देयता :

ए) i) कंपनीच्या मालकीची/कंपनीचे ताब्यात असलेली काही जमीन, ईमारती इत्यादी वरील नगरपालिका आणि इतर स्थानिक करासंबंधी, निर्धारण प्रलंबित असल्यामुळे तसेच काही प्रकरणात देयता स्विकृत न केल्यामुळे : रक्कम स्पष्ट करण्यांसारखी नाही.
ii) सन २०१८-१९ ते २०२२-२३ या वर्षाकरीता आगार विभाग बल्लारशहाचे बाबतीत नगर परिषद कर देयतेवरील रुपये ३५.२७ लाख (मागील वर्षी रुपये १४.३७ लाख) व्याजाची देयता समुचित प्राधिका-याकडे अपील प्रलंबित असल्यामुळे कंपनीने स्विकृत केलेली नाही.
iii) जमीन महसूल जर काही असल्यास.

बी) ताळेबंदाचे दिवशी भांडवली कार्यावरील अंमलबजावणीस शिल्लक असलेल्या कराराची तरतूद न केलेली अंदाजित रक्कम : निरंक

सी) i) पात्र मजूरांसाठी या अगोदरच्या वर्षाची भविष्य निर्वाह निधीचे संबंधात जर काही देयता असल्यास
ii) विविध वन प्रकल्प विभागाअंतर्गत कंपनीद्वारे मजूरांच्या भविष्य निर्वाह निधीचे शोधनात अनियमितता/शोधन न करणे या संबंधाने भविष्य निर्वाह निधी आयुक्त, नागपूर यांनी आकारलेल्या नुकसान भरपाई/देणी बाबत अंदाजित देयता रुपये ३६१४.८५ लाख (मागील वर्षी रुपये २०८६.९८ लाख) सदर प्रकरणी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अपील न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार पुढील निर्णयाचे अधिन राहून कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच भविष्य निर्वाह आयुक्त अकोला यांनी यवतमाळ वन प्रकल्प विभागात भविष्य निर्वाह निधी संबंधाने आकारलेल्या नुकसान भरपाई/देणी बाबत अपील/रिट याचिकेवर निर्णय प्रलंबित असल्याने देयता रुपये २०२.७४ लाख. (मागील वर्षी २०२.७४ लाख)

iii) मजूरांचे संबंधाने उपदानाबाबत जर काही देयता असल्यास.

iv) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेशान्वये किनवट वन प्रकल्प विभागातील मजूरांना कामावरुन कमी करण्यांचे प्रकरणाचे बाबतीत देयता रुपये २६.३४ लाख (मागील वर्षी रुपये २६.३४ लाख) आणि श्री के. डी. चव्हाण, वनमजूर यांचेवर झालेल्या वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झाल्यामुळे नुकसान भरपाई संबंधाने श्रम न्यायालय नांदेड यांनी प्रकरण क्रमांक डब्लूसीए/११/२००० मध्ये नुकसान भरपाई संबंधाने पारित केलेल्या आदेशावर कंपनीने दाखल केलेले अपील प्रलंबित असल्याने देयता रुपये ०.८३ लाख (मागील वर्षी रुपये ०.८३ लाख)

डी) विक्रीकर/मूल्यवर्धित कर, वस्तू व सेवा कर/आयकर निर्धारण प्रलंबित असल्यामुळे/लांबणीवर टाकल्यामुळे दंड, व्याज इ. बाबत जर काही देयता असल्यास.

ई) कर्मचारी आणि मजूर यांच्या विविध मागण्या अभिनिर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे, त्याबाबत देयता निश्चित करता येण्यासारखी नाही.

एफ) रोपवन क्षेत्रातील उभ्या झाडांची प्रत्यक्ष पडताळणी न झाल्यामुळे काही संभाव्य नुकसान इत्यादी असल्यास.

जी) भूपट्टयाचे भाटका (Patta Rent) संबंधाने काही देयता इ. असल्यास

एच) मा. कामगार न्यायालय तृतीय नागपूर यांनी प्रकरण क्रमांक पीजीए/३/२०१३ मध्ये दिनांक २८.०९.२०१५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार श्री के. जी. सहारे, मजूर नागपूर वन प्रकल्प विभाग यांना सेवा उपदानाचे संबंधाने, कंपनीने दाखल केलेले अपील प्रलंबित असल्याने देयता रुपये ०.९७ लाख (मागील वर्षी रुपये ०.९७ लाख).

आय) वर नमूद केलेल्या प्रकरणा व्यतिरिक्त इतर कंपनीविरुध्द सुरु केलेल्या न्यायालयीन प्रकरणात संभाव्य देयता निश्चित करता येत नाही.

जे) आयकर निर्धारणामधील अपील संबंधाने देयता रुपये १९४.२९ लाख (मागील वर्षी रुपये ८८.६४ लाख)

## टिपणी - ३८ अतिरीक्त विनियामक विषयक माहिती

### अ) धारण केलेल्या बेनामी संपत्तीचा तपशिल :

बेनामी व्यवहार (प्रतिबंध) अधिनियम १९८८ व त्याअंतर्गत नियमानुसार कंपनीने कोणतेही बेनामी संपत्ती धारण केली नसल्याने कंपनीविरुध्द कार्यवाही प्रारंभ झाली नाही किंवा प्रलंबित नाही. त्यामुळे हयाबाबत प्रकटन आवश्यक नाही.

### ब) बुध्दीपुरस्सर कसुरदार :

ताळेबंदीच्या दिवशी किंवा वित्तीय विवरणपत्रास मंजूरीचे दिवशी कंपनीला बुध्दीपुरस्सर कसूरदार घोषित केलेले नाही, त्यामुळे हयाबाबत प्रकटन आवश्यक नाही.

### क) कंपनी निबंधकाकडे (ROC) भार किंवा समाधानाची नोंदणी

सांविधिक कालावधी नंतर ज्याची नोंदणी कंपनी निबंधकाकडे (रजिस्ट्रार ऑफ कंपनीज) करावयाची आहे, असा कोणताही भार कंपन्याविरुध्द नाही. त्यामुळे यासंबंधाने प्रकटन आवश्यक नाही.

**ड) कंपनीच्या स्तरांच्या संख्येचे अनुपालन**

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम २ अनुच्छेद (८७) अंतर्गत कंपन्यांचे (स्तराच्या संख्येवर निर्बंध) नियम २०१७ सह वाचावे. त्यानुसार विहीत स्तराच्या संख्येचे अनुपालन करावयाचे आहे. अशा डाउनस्ट्रीम (downstream) कंपन्यामध्ये कंपनीची गुंतवणूक नाही. त्यामुळे यासबंधाने कोणतेही प्रकटन आवश्यक नाही.

**ई ) ऋणाचे वापर**

कंपनीने ऋण स्वरुपात निधी घेतला नाही. त्यामुळे ऋणाच्या वापरासबंधाने आवश्यक प्रकटन कंपनीस लागू नाही.

**फ) क्रिस्टो चलन किंवा आभासी चलनाचा तपशिल**

कंपनीने वित्तीय वर्षात क्रिस्टो चलन किंवा आभासी चलनात व्यापार किंवा गुंतवणूक केलेली नाही. त्यामुळे यासाठी आवश्यक प्रकटन कंपनीला लागू नाही.

**टिप्पणी - ३९ इतर महत्वाच्या बाबी**

अ) व्यापारी येणे अंतर्गत विविध लेख्यातील वैयक्तिक शिल्लक, येणे रक्कमा, सरकार आणि इतर एजन्सीकडून मिळत असलेल्या नुकसान भरपाईचा दावा आणि इतर येणे विकलनाधिक्य यांस पुष्टी मिळालेली नाही.

ब) ऋणा अंतर्गत कर्मचा-यांकडून नामंजूर प्रमाणकापोटी वसूलीयोग्य रक्कम रुपये ५४.४४ लाख (मागील वर्षी रुपये ५४.२३ लाख) चा समावेश आहे.

क) कंपनीच्या आधीच ताब्यात असलेल्या जमिनीच्या संबंधाने जमीन महसूल इतर काही असल्यास त्याकरीता कोणतीही तरतूद केलेली नाही.

ड) जनहित याचिका क्रमांक ३४२१५ तत्कालीन खामगाव वन प्रकल्प विभागातील रोजगार हमी योजना संबंधाने प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने जर काही देयता असल्यास.

ई) वितरकांना खर्चासाठी दिलेले अग्रिम वितरकाचे पदनामाने बँकेत खाते उघडून हाताळण्यात येत असून ऋण व अग्रिमा अंतर्गत वर्गीकृत करण्यात आले आहे.

फ) सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकी पोटी लेख्यात दिनांक ३१.०३.२०२२ अखेर रुपये ४५००.०० लाख (मागील वर्षी रु. ४५००.०० लाख) (अंदाजे) तदर्थ आधारावर तरतूद करण्यात आलेली आहे.

जी) चालू वर्षी कर्मचा-यांसाठी प्रोत्साहनात्मक रकमेपोटी अंदाजे रु. ७००.०० लाख (मागील वर्षी रु. ८००.०० लाख) तदर्थ तरतूद करण्यात आलेली आहे.

एच) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता दिनांक ०१-११-२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये रू. ७०.०० लक्ष लाभांष मंजूर करण्यात आला, त्याचे शोधन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

आय) त्यानंतर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता रू. ३२७.५० लक्ष आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता रू. २७५.०० लक्ष लाभांष अनुक्रमे दिनांक ३०-०५-२०२३ आणि २७-०९-२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आला व त्याचे शोधन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात करण्यात आले.

जे) एकत्रिकरणाच्या हेतूकरीता, कंपनीने एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड या सहाय्यक कंपनीच्या मंजूर आणि लेखापरिक्षीत स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रांनाच एकमेव आधार ठेवलेला आहे. सहाय्यक कंपनीने आपले मंजूर व लेखापरिक्षीत वित्तीय विवरणपत्र त्यांचे पत्र क्र. FGZ/CEO/2023-24/10/618 दिनांक १८-१०-२०२३ अन्वये सादर केले आहे. मे. पी.डी.एम. अग्रवाल अॅड कंपनी, सनदी लेखापाल, एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड या सहाय्यक कंपनीचे सांवधिक लेखापरिक्षक यांनी दिनांक ३१-०३-२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरीता स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रावर दिनांक २७-०९-२०२३ रोजीच्या लेखापरीक्षण अहवालात मत अस्विकृत (Disclaimer of opinion) जारी केले आहे. .

**टिप्पणी - ४० पुन:र्गट आणि फेर मांडणी**

ताळेबंद, समावेशक उत्पन्नासह नफा तोटा पत्रक आणि रोख प्रवाह विवरणपत्र व भाग भांडवलातील बदल व त्यांचेशी संबंधित असलेल्या टिप्पणीमधील मागील वर्षाचे आकडे आवश्यक त्या ठिकाणी पुनर्गट आणि फेर मांडणी करुन घेतलेले आहेत. आर्थिक विवरण पत्रातील आकडेवारी जवळच्या लाख व हजारात दर्शविण्यांत आली आहे.

एकत्रिकृत वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग असलेल्या टिपणी क्रमांक १ ते ४० करिता स्वाक्षरी.

आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार

आमचे सम दिनांकाचे संलग्न अहवालानुसार
शाह बाहेती चांडक आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. १०९५१३ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए जय पोपटानी)
भागीदार
स.क्र.१३५०३८
UDIN : 23135038BGZDQZ9340

सी.एन. पटेल आणि कंपनी
सनदी लेखापाल करिता
संस्था नोंदणी क्र. ११२५५२ डब्ल्यू
स्वाक्षरित
(सीए मिलींद पटेल)
भागीदार
स.क्र.१०९९७४
UDIN : 23109974BGUIHM7200

स्थळ : नागपूर
दिनांक : २८.१२.२०२३

संचालक मंडळाचे वतीने व करिता

स्वाक्षरित
(सुधीर मुनगंटीवार)
अध्यक्ष
सं.ओ.क्र # ०७२०८३७३

स्वाक्षरित
(विकास गुप्ता)
व्यवस्थापकीय संचालक
सं.ओ.क्र # ०९७५३९०५

स्वाक्षरित
(सीए कौस्तुभ विनय भांबुरकर)
लेखा नियंत्रक व वित्तीय सल्लागार

स्वाक्षरित
(सीएस सौरभ सिंह)
कंपनी सचिव
ए-२२०५३

स्थळ : चंद्रपूर
दिनांक : २८.१२.२०२३